परस्परं भावयन्तः

म प्र

मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक ७६ ✤ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ २४) ✤ डिसेंबर २००८

वेबसाईट : www.marathepratishthan.org ई-मेल : maratheparivar@yahoo.co.in

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.) (फक्ता खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय



प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना माझा स्नेहपूर्वक नमस्कार. 'हितगुज'चा अमृतमहोत्सवी ७५वा अंक सगळ्यांना आवडला. त्याचे जोरदार स्वागत आपणा सर्वांनी केले. तशी पत्रे पाठवून कळविले तसेच दूरध्वनीवरून सांगितले. खरोखर एवढी प्रचंड दाद आपण दिलीत. मी अक्षरशः भारावून गेले आहे. संपादकीय काय लिहावं हे ही सूचत नाही.

या अंकात 'वाचकांचा पत्रव्यवहार' म्हणून ज्यांनी ज्यांनी पत्रे पाठविली आहेत ती सर्व पत्रे प्रसिद्ध करीत आहे. 'हितगुज'च्या ७५व्या अंकाचे प्रकाशन मराठे परिवाराला साजेसे, शोभेसे असेच दिमाखदार झाले.

विख्यात नाटककार माननीय सुरेश खरे यांनी 'हितगुज'चे भरभरून कौतुक केले. भाषणात ते म्हणाले, ''इतका सुरेख, सुंदर, वाचनीय अंक आणि तोही विनामूल्य हा मला बसलेला सुखद धक्का आहे. फुकट काही ठेऊ नका. कारण फुकट मिळालेल्या गोष्टीची किंमत वाटत नाही. 'हितगुज'चे सर्वच अंक मूल्यवान आहेत. यातली 'संपादकीयं' ही विशेषकरून सामाजिक भान असेलली अशी दूरदृष्टीने सामाजिक जाण ठेऊन लेखन केलेली दिसतात. हे केवळ रिर्पोटिंग नाही. अहवाल नाही. या अंकातील मुलाखती आयुष्याला मार्गदर्शन करणाऱ्या आहेत. दर्जेदार, दुर्मिळ घटना या मुलाखतींमध्ये आल्या आहेत. त्यामुळे गुणवत्ता टिकून राहील. आज इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात जितके मराठे संख्येने आढळतात तितके कुणीच माझ्या पाहाण्यात नाहीत. आजच्या कॉम्प्युटरच्या काळात मराठी

(पृष्ठ ३ वर)

## जाहीर निमंत्रण

मराठे प्रतिष्ठानचा २९वा वर्धापन दिन व पुणे शाखे तर्फे काढण्यात येणाऱ्या २००९ सालच्या डायरीचा प्रकाशन समारंभअसा एकत्र कार्यक्रम गुरुवार दिनांक २५ डिसेंबर २००८ रोजी आयोजित केला आहे.

या निमित्त ठाणम्याचे श्री. मिलींद सुधाकर मराठे (अध्यक्ष-अखिल भारतीय विद्यार्थी परिषद) व त्यांचे सासरे श्री. कृष्णाजी जनार्दन दिवेकर (प्रसिद्ध लेखक) यांच्या मुलाखती श्री. गजानन चिंतामण मराठे घेणार आहेत व करमणुकीसाठी गाण्याचे काही कार्यक्रम होणार आहेत. तरी आपण या कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी सहकुटुंब सहपरिवार अवश्य उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी ही विनंती. कार्यक्रम विनामूल्य आहे.

**स्थळ - गांधर्व महाविद्यालय सभागृह**
४१५ शनिवार पेठ, मेहुणपुरा
जोशी बंधू मंगल कार्यालयाजवळ
वर्तक आश्रमाशेजारी
पुणे ४११ ०३०
वेळ - सायंकाळी ४ ते ८

**सौ. नीलांबरी मराठे (पृ.२८०)**

✤ संपादिका : डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे : ८/१३, सहकार नगर, वडाळा (प), मुंबई-४०००३१ ✤
दूरध्वनी : २४१५०८८९ ● ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
✤ अक्षरजुळणी : सौ.सुप्रिया जयंत रेडकर (लक्ष्मी ग्राफिक्स), दादर ✤

मुंबईतुन रेल्वेने नेणारी राजेश रानडे.यांची लोकप्रिय

## कुलस्वामिनी

# अंबाजोगाई

दर्शन यात्रा



## सोबत परळी वैजनाथ

**दर महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार-रविवार.**

**सहल खर्च रुपये**

**रुपये : ३२००/- २एसी, २७००/- ३एसी, १७००/- स्लीपर क्लास**

या मध्ये रेल्वे प्रवास,मिनी बस/सुमो,चहा/नाष्टा व दोन वेळेचे जेवण इत्यादी खर्च समाविष्ट आहे.

---

## exclusive
# कोस्टल कर्नाटक

**नॉर्थ कॅनरा ते साऊथ कॅनरा ( कारवार ते उडपी )**

पंचक्षेत्र : गोकर्ण-महाबळेश्वर आणि शेजेश्वर,धारेश्वर,गुणवंतेश्वर व मुरडेश्वर

नॉर्थ कॅनरा : सदाशीवगड,कारवार,अंकोला,कुमठा,होनावर,येलापूर,सिरसी,बनवासी

साऊथ कॅनरा : कोल्लूर,मरवंथे,कुंदापूर,अन्नेगुडडी,उडपी,शृंगेरी,होरनाडू,धर्मस्थळ,कटील,

**मालपे व कापू बिच.**

मुंबई ते कारवार व उडपी ते मुंबई कोकणरेल्वेने प्रवास

# सहल खर्च रु.७४५०/-


या मध्ये चहा/नाष्टा/जेवण/नॉन एसी बस/नॉन एसी हॉटेल वास्तव्य इत्यादी समाविष्ट आहे.

रेल्वे प्रवास किंवा विमान प्रवास भाडे अधिक

## दिनांक : ११ ते १८ जानेवारी

अधिक माहिती करिता लॉगऑन करा **www.tourways.in**

या सहली सोबत येत आहेत




सादर करतील नथुराम ते देवराम

नोंदणी व अधिक महिती करीता संपर्क

अनोळखी जगाची ओळख

**TOURWAYS**

C-308 Palm Acres, M.P. Rd, Mulund east Mumbai 81

आयोजक: राजेश रानडे.

092 23 273 496

022 65 281 281

(पृष्ठ १ वरून)

## संपादकीय

माणूस दूर जाताना दिसतो आहे. पण या 'हितगुज'च्या माध्यमातून तुम्ही मराठे मनाने जवळ येत आहात ही आनंदाची गोष्ट आहे. तुमच्यात आत्मीयतेचा, जवळीकेचा, प्रेमाचा पूल बांधला जातो आहे ही अभिनंदनीय गोष्ट आहे'' असो.

मराठे प्रतिष्ठान, पुणे शाखेचा वर्धापन दिन आणि दैनंदिनी प्रकाशन, पुणे येथे २५ डिसेंबरला आहे. त्याचप्रमाणे रविवारी दि.२८ डिसेंबर २००८ ला मुंबई येथे 'दामले योग केंद्रा'त वार्षिक सर्वसाधारण सभा व गुणवत्ता पारितोषिके देण्याचा कार्यक्रम आहे. दोन्ही कार्यक्रमेला आवर्जून यावे. मराठे प्रतिष्ठानच्या कार्यक्रमांना आपली अुपस्थिती शोभा देत असते, हे विसरू नका. भेटी-गाठींमुळे सहवास वाढतो. आत्मीयतेचे आपुलकीचे संबंध दृढ होतात.

'हितगुज'चा ७५वा अंक चांगला निघाला. तो चांगला निघणारच होता कारण शाईनिंग मराठे यांच्या मुलाखतींनी अंक सजल्यावर तो चांगला निघाला नाही तरच नवल !

या अंकाचे वैशिष्ट्य म्हणजे या अंकात वार्षिक अहवाल, आयव्यय हिशेबपत्रक दिले आहे. हा अहवाल मराठे प्रतिष्ठानचे सदस्य यांना पाठवायचा असतो. पण 'हितगुज'चे ते वर्गणीदार नसले तरी कार्यकारिणीत सर्वानुमते असे ठरले की हा अहवाल वेगळा, स्वतंत्र छापून न पाठविता 'हितगुज' मासिकही त्यांना पाठवावे. तेव्हा कुलबांधवांकडून अशी अपेक्षा आहे की त्यांनीही 'हितगुज'चे वाचक वर्गणीदार व्हावे. ही अपेक्षापूर्ती होईल याची मला निश्चिती वाटते, असो. ज्यांना 'हितगुज' मासिक मिळत नाही किंवा घराचा पत्ता नवीन बदलला असल्यास, तसे कार्ड पाठवून अथवा दूरध्वनीवरून (या अंकात म.प्र. कार्यकारिणी मंडळातील सर्वांचे दूरध्वनी क्रमांक दिले आहेत.) कळवावे. म.प्र. कार्यकारिणीचे अुपाध्यक्ष श्री.रमाकांत विद्वांस यांनी मोठ्या मेहनतीने 'हितगुज'च्या वर्गणीदारांची अद्ययावत यादी बनविली आहे. आपल्या घराचा बदललेला पत्ता त्यात समाविष्ट करता येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

'हितगुज'च्या कामात माझे पती श्री.प्रभाकर (कोषाध्यक्ष) यांचा वाटा मोलाचा आहे. त्यांना हे लिहिलेले आवडणार नाही पण त्यांचा रोष पत्करून मी हे लिहिले आहे त्याला आणखीही अेक कारण आहे. पत्राद्वारे वा दूरध्वनीवरून अनेकांनी मला आपल्याला संपादन सहाय्य करणाऱ्यांनाही धन्यवाद द्यायला सांगितले आहेत, असो.

हितगुज'ने अेक वेगळी अुंची गाठली आहे. तो त्याच अुंचीवर कायम राहील असा विश्वास मला वाटतो.

आपली शुभचिंतक
डॉ.सौ.सुमेधा प्र. मराठे (पृ.१२०)
संपादिका - हितगुज
दि.१८ नोव्हेंबर, २००८

❑❑❑

### जाहीर निमंत्रण

मराठे प्रतिष्ठानची पंचविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ डिसेंबर २००८ रोजी सायंकाळी ५.०० वा. 'दामले योगकेंद्र सभागृह', लोकमान्यनगर सभागृहाजवळ, मनमाला टँक रोड, माटुंगा रोड, (प.रे.), मुंबई ४०००१६ येथे आयोजित केली आहे. सर्वांनी अुपस्थित रहावे, हि विनंती.

### अनुक्रमणिका



| क्रमांक | विषय | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १) | जीवन | श्रीमती इंद्रायणी अ. मराठे | ०५ |
| २) | आम्ही म्हातारे !!! | श्री.वा.ग. मराठे | ०६ |
| ३) | प्रेमळ पित्याचे पुण्यस्मरण | श्री.सदानंद विष्णू | ०७ |
| ४) | सामान्यज्ञान स्पर्धा | | ०८ |
| ५) | मराठे प्रतिष्ठान २५वा वार्षिक अहवाल | | ११ |
| ६) | ताळेबंद आणि आयव्यय पत्रक | | १४ |
| ७) | 'हितगुज' ७५व्या अंकाचे प्रकाशनवृत्त | | १८ |
| ८) | मानसन्मान | | १९ |
| ९) | सत्यनारायण कथेचा भावार्थ | श्री.महेश अ. मराठे | २० |
| १०) | वाचकांचा पत्रव्यवहार | | २१ |

**श्री.वामन शंकर तथा दादासाहेब मराठे (पृ.२७७), ठाणे यांनी लिहिला इंग्रजीत 'हरिपाठ'**

## विदेशी भाविकांसाठी ज्ञानेश्वरांच्या हरिपाठाची इंग्रजी आवृत्ती

**मुंबई प्रहार बुधवार.२१.१०.२००८ पुरवणी,**
**प्रेषक चिं.त्र्यं. मराठे, कळवा**

श्रीसंत ज्ञानेश्वरांचा 'हरिपाठ' हा ग्रंथ भगवंताशी सख्य साधण्याचा भक्ती खरंतर ज्ञान, वैराग्य आणि योग यांच्या माध्यमातून संप्रदायातील सुलभ मार्ग माध्यमातून भगवंताशी जवळीक साधता येते. परंतु हे तिन्ही मार्ग कठोर साधना आणि दिव्य तपश्चर्येनंतर प्राप्त होतात. आध्यात्मिक साधनेच्या या तिन्ही परमोच्च अवस्थांची वाट चोखाळण्यासाठी ज्ञानेश्वर महाराजांनी स्वतंत्र ग्रंथरचना केली. ज्ञानोपासकांसाठी 'ज्ञानेश्वरी', योग्यांसाठी 'चांगदेव पासष्टी' आणि वैराग्यपूर्ण भक्ती करू इच्छिणाऱ्यांसाठी 'अमृतानुभव' हे ग्रंथ त्यांनी लिहिले. या ग्रंथांनंतर सामान्य भाविकांसाठी त्यांनी २८ अभंगांचा 'हरिपाठ' लिहिला. ज्ञान, वैराग्य आणि योग हे मार्ग अत्यंत कठीण असल्याने 'हरिपाठ' मधील सुलभ साधन अनेकांना भावले. म्हणूनच आजही लाखो भाविक 'हरिपाठ'चे नित्यनेमाने पठण करतात.




श्रीसंत ज्ञानेश्वर महाराजांनी सर्वसामान्य भाविकांसाठी लिहिलेला 'हरिपाठ' हा ग्रंथ आता भाषा, प्रांत आणि देशांच्या सीमा पार करून अमेरिकेत पोहोचला असून तिथेही तो लोकप्रिय होत आहे. अनिवासी भारतीयच नव्हे; तर काही विदेशी भाविकही 'हरिपाठ'च्या प्रेमात पडले आहेत. मराठीतील हे तत्त्वज्ञान परदेशी भाविकांना उच्चारणं सोपं व्हावं, यासाठी ठाणे येथील 'ज्ञानदेव सेवा मंडळा'चे विश्वस्त वामन शंकर ऊर्फ दादासाहेब मराठे यांनी देवनागरीतील 'हरिपाठ' इंग्रजी लिपित प्रकाशित केला आहे. या इंग्रजी परिपाठाच्या शेकडो प्रती अमेरिकेत दाखल झाल्या आहेत.

मोडोनिया वाटा सुक्ष्म दुस्तर। केला राज्यभार चाले ऐसा। असे ज्या नाम साधनेचे वर्णन सांगितले जाते, ते साधन 'हरिपाठ'च्या रूपाने अमेरिकेत कसे पोहोचले, हे सांगताना दादासाहेब मराठे म्हणाले की, अनेक मराठी कुटुंबं उद्योग वा व्यवसायानिमित्ताने अमेरिकेत स्थायिक झाली आहेत. तिथे त्यांना मान-सन्मान आणि ऐश्वर्य मिळतं, पण मन:शांती मात्र अभावानेच मिळते. म्हणूनच मनाला शांती देणारे 'हरिपाठ' सारखे सोपं साधन या लोकांना हवंसं वाटू लागतं. त्यामुळे अमेरिकेतील ॲटलांटा या शहरातील भाविकांनी 'हरिपाठ मंडळा'ची स्थापना केलीय. यआ मंडळाचे सदस्य आपल्या कुटुंबासोबत दररोज संध्याकाळी 'हरिपाठ' चं पठण करतात. तर दर गुरुवारी 'हरिपाठ'चं सामुदायिक पठण होतं. लय, ताल आणि भाव हे पाहून परदेशी मंडळीही या साधनेत सहभागी होतात. माझी नात अपूर्वाही या 'हरिपाठ' मंडळाची सदस्य आहे. मध्यंतरी सुट्टीत ती ठाण्यात आली होती तेव्हा या हरिपाठ मंडळाची माहिती तिने मला सांगितली. विदेशी मुलं आणि मोठ्यांना मराठी येत नसल्यामुळे इच्छा असूनही त्यांना हरिपाठ पाठ करता येत नाही, 'हरिपाठ' इंग्रजीत असता तर त्यांची ही अडचण दूर झाली असती, अशीही माहिती तिने सांगितली. ते ऐकून त्याच रात्री मी 'हरिपाठ'चं इंग्रजी लिपित लेखन सुरु केलं. पंधरा दिवसांत 'हरिपाठ' इंग्रजी लिपित छापून तयार झाला. सुरूवातीला फक्त दोनशे प्रती अपूर्वाने अमेरिकेला नेल्या होत्या. मात्र आता दर महिन्याला शेकडो प्रतींची मागणी येत आहे.

'हरिपाठ' अमेरिकेत गेल्यावर ठाण्यातील काही दक्षिण भारतीय भविकांनीही 'हरिपाठ'च्या प्रतींची मागणी केली. ठाण्यात अय्यप्पा स्वामींच्या मंदिरात सत्संग होतो. त्याला उपस्थित राहणाऱ्या भाविकांनी मंदिरात चालणारा 'हरिपाठ' पाहिला. ही साधना त्यांनाही आवडली. त्यांनी दादासाहेब मराठे यांच्याकडून इंग्रजी लिपितील 'हरिपाठ'च्या प्रती मागवून घेतल्या. आता तेही नित्यनेमाने 'हरिपाठ'चं पठण करीत आहेत.

❑❑❑

## प्रा. गंगाधर गाडगीळांचे शिकवणे....

नुकतेच निधन झालेले साहित्यिक प्रा. गंगाधर गाडगीळ हे १९४८ ते १९५० या काळांत माटुंग्याच्या पोदार कॉलेजमधे अर्थशास्त्राचे माझे प्राध्यापक होते. हा रुक्ष विषय ते सोपा करून संथ लयीत, मुद्देसूदपणे समजावून सांगत. त्यांच्या शिकविण्यात अधुनमधून विनोदाचा शिडकावा असे. law of diminishing returns हा सिद्धांत शिकवताना, त्याचे अपवाद सांगताना त्यांची विनोदी शैली दिसून आली. 'वयात' येणारी मुलगी व स्कॉच व्हिस्की यांची काळाप्रमाणे किंमत कमी न होता ती वाढते ही उदाहरणे सांगितली. optimum उत्पादित ही कल्पना विशद करताना, त्यांनी बांधेसूद मुलीची गोष्ट सांगितली. ती जरा जाड असेल किंवा बारीक असेल तर गोड दिसणार नाही. त्याप्रमाणे उत्पादनाची पातळी जास्त किंवा कमी नसणे म्हणजे ऑप्टिमम असे ते गंमतीत म्हणाले. स्वीटमीटचा धंदा आहे म्हणून सांगणारा 'वर' मुलगा, प्रत्यक्षात रस्त्यावर 'आलेपाक' विकणारा कसा निघाला. यााच किस्सा त्यांनी सांगितला. वासंती खटखटे या पोदार कॉलेजमधील विद्यार्थिनीशी त्यांनी प्रेमविवाह केला. त्या काळी कॉमर्स कॉलेजात मुली फार कमी प्रमाणात असत. त्यामुळे हा विवाह तेव्हा गाजला. जीवनंत 'वासंती'क अंक तिच्यामुळे सुरू झाला असे उद्गार त्यांनी कॉलेजच्या निरोप समारंभामध्ये काढले. त्यांनी अर्थशास्त्रावर पुस्तकेही लिहिली व त्यांचा विद्यार्थ्यांना खूप फायदा झाला.

**ग.भा. मराठे, घाटकोपर (पृ.४२७)**
महाराष्ट्र टाईम्स-२०.९.२००८

'हितगुज'च्या अमृतमहोत्सवी अंकात 'लग्न' ही कविता प्रेषक श्री. कालिदास मराठे (पृ.५४१), गोवा म्हणून प्रकाशित केली आहे. 'लग्न'या कवितेच्या कवयित्री सौ. रोहिणी रणदिवे, (ठाणे) या आहेत. असे श्री. कालिदास मराठे यांनी कळविले आहे.

# जीवन

**श्रीमती इंदिरा अनंत मराठे**

जीवन एक खेळ आहे. माणूस जन्माला आल्यापासून मरेपर्यंत जगतो. मधल्या जगण्याला जीवन म्हणतात. जन्माला आल्या नंतर त्याच्या खेळाची तयारी सुरू होते. त्यासाठी बालपणी विद्याभ्यास, बळकट शरीर, चांगल्या सवयी, सुसंस्काराची ठेव, मिळवावी लागते. नाहीतर खेळ अयशस्वी होतो. जसे खेळाडुला खेळाची पूर्ण माहिती, खेळातील डावपेच, यांच्या बरोबर योग्य आहार व्यायाम करावा लागतो आणि तसेच नंतर उत्तम मार्गदर्शनही हवे म्हणजे त्याची प्रगती उत्तम प्रकारे होते.

हे जीवन सुव्यवस्थित होण्यासाठी या जगन्नियंत्याने यमराजाची नेमणूक केली. त्याला राजा केला. तो अगदी इमाने इतबारे आपला कारभार चालवतो, अगदी कडक शिस्त, कसलाच हलगर्जीपणा नाही. कोणाच्या स्तुतीनिंदेची पर्वा नाही, नियम म्हणजे नियम. कोठेही तडजोड नाही. म्हणून तो सर्वांना अतिशय क्रूर आणि कठोर वाटतो. परंतु विचार केला की त्याच्या कृपादृष्टीचा परिचय होतो.

अगदी कंटाळवाणे शेकडो वर्षे हाल अपेष्टा सोसत जीवन जगण्यापेक्षा हसत खेळत त्याचे बोलावणे आले. तर ते सौभाग्य नाही का ?

विचार करा एक ऐसपैस मोठ्ठे घर त्यात पिढ्यानपिढ्याचे नातलग खापर-पणजोबा, पणजोबा, आजोबा, बाबा, आई, आजी, पणजी, खापर-पणजी आणि तशीच चुलत हीसर्व मंडळी राहत असतील ही सर्व वयाप्रमाणे वृद्ध आहेत. त्यांच्या त्यांच्या प्रकृती प्रमाणे शरीर साथ देत नाहीये. कोण खोकतात, कोण आणि कसल्या आजाराने त्रस्त आहेत आणि सेवा करता करता दुसऱ्याचा जीव मेटाकुटीला आलाय सगळीकडे दु:ख, वैताग आहे हे दृश्य कसे दिसेल ? प्रसन्न वाटेल का ?

म्हणूनच यम-देवाची ही व्यवस्था आपल्यावर कृपा नव्हे का ? परंतु जरा लहरी आहे. आणि कोणाला कधी बोलावे हे ही अज्ञात असतो. पण सर्वांना बोलावणे आहे हे मात्र निश्चित. सगळ्यांना आलेले बोलावणे आपण नित्य पाहतो, तरीही आपल्या बाबतीतच जाणीवपूर्वक विसरतो. इथेच सर्व चुकते आणि आम्ही बेफिकिरीने वागतो त्याचा परिणाम दु:खात होतो.

जीवन हा प्रवास आहे. आपण घरातून प्रवासाला निघतो आणि परत घरी परततो मध्ये आपला प्रवास चालतो. या प्रवासात आपल्याला अनेक अडचणी येतात. त्यासाठी पूर्व-तयारी करावी लागते. स्वत:ची गाडी असेल तर तिची देखभाल त्यात इंधन, पाणी, कुशल ड्रायव्हर, लागणाऱ्या सामानाची बांधाबांध प्रकृतीच्या बाबतीत औषध पाणी गेल्यानंतर उतरण्याची सोय हे सर्व करणे जरूर आहे. नाहीतर प्रवासात त्रास होतो, मन:शांती बिघडते. प्रवासाचे सुख आनंद मिळत नाही.

अगदी तसेच जीवनात उत्तम शरीर आचार विचार, आहार, सुसंस्कृती, प्रेम, आदर, हे सगळे असेल तर जीवन. प्रवास सोपा, सुखकर होतो. चांगले सोबती मिळतात आणि जीवनात आनंद प्राप्त होतो.

परतीच्या प्रवासासाठी यमदेव बोलावतो तेव्हा आपली तयारी झालेली असेल तर म्हणजे बायको मुलांची सोय करून भगवन्नामाच्या शिदोरीची तयारी वर्तमानकाळातच केली तर पुढचा परतीचा प्रवासही चांगलाच होतो.

खेळात जसा अंपायर तसा यमदेव आहे. आपण सक्षम असे पर्यंत तो खेळ बघत असतो. खेळून खेळून दमलो आणि आपल्या कडून चूक झालीतर आऊट घोषीत करतो आपण खेळातून बाहेर पडतो. त्या जागी दुसरा खेळाडू मैदानात उतरतो. काही लवकर दमतात तर काही उशीरा पण एका मागोमाग एक करून बाद होतात. त्यावेळेपुरता खेळ संपतो. घरी परततो परत नव्या जोमाने खेळाला सामोरे जातो. अगदी तसेच विश्वाच्या मैदानावर जीवनाचा खेळ अव्याहत चालत आहे.

खेळाच्या मैदानावर यष्टीरक्षक किंवा गोलकीपर प्रमाणे यमदूत आपल्यावर लक्ष ठेवून असतो. बाद होण्याच्या वेळेस अंपायर आऊट घोषीत करतो.

कुठल्याही खेळात एक गडी बाद होतो. त्या जागी दुसरा खेळाडू येतो, अगदी सोंगटीच्या पटात, बुद्धीबळात, हेच पहायला मिळते. एक सोंगटी दुसरीला मारते, त्या जागी ती स्थिरावते. परत तिला दुसरी मारते. अशा प्रकारे खेळ चालतो.

अगदी त्याच प्रकारे जीवनाचा खेळ यमदेवाच्या नियंत्रणाखाली चाललेला आहे. त्याला उशीर ही गोष्ट माहितच नाही. तो अगदी अधीर आहे. बोलावल्या बरोबर हजर व्हायला हवे. हाकेला ओ देऊन निघायलाच हवे. अगदी असेल तसे, आहे त्या परिस्थितीत, एका क्षणाचाही विलंब न करता जाणे भाग आहे. तिथे कसली विनवणी अर्ज नाही. शिस्त म्हणजे शिस्त, दुसऱ्याचा खोळंबा नाही. लगेच दुसऱ्याला जागा मिळाली पाहिजे. हा नियम.

हाच नियम जगातल्या सर्व प्राणी, कीटक, पक्षी, वनस्पतीच्या बाबतीत दिसून येतो. प्राणी कीटक मरतात पुन: दुसरे निर्माण होतात. वनस्पतीची पानगळ होते. त्या जागी दुसरी पाने येतात. झाडे, वनस्पतीची आयुष्य मर्यादा संपण्या अगोदर दुसऱ्याची निर्माण व्यवस्था पहिली नष्ट झाली की दुसरी तयार हे सर्व अव्याहत चालू आहे. हे सर्व आपण पाहतोना ?

कोणाचीच कसली तक्रार नाही. मनुष्य-प्राणीच यमदेवाबद्दल तक्रार करताना दिसतो. कारण त्याची जगण्याची इच्छाच जबरदस्त असते. कारण वासनातृप्तीच होत नाही. वासना तृप्त करता करता थकून जातो शरीर साथ देत नाही तरीही जायची तयारी नाही आणि वासने-पोटी परत जन्म असे जीवन चालत राहते आणि म्हणूनच जीवन न संपणारा खेळ आहे.

**– श्रीमती इंदिरा अनंत मराठे**
वेळगे, पाळी. गोवा

❑❑❑

‘हितगुज’च्या अमृतमहोत्सवी अंकात, अभिनेत्री अुषा किरण यांची मुलाखत श्री. विनायक केशव मराठे (वी.के.) व वा.ग. मराठे यांनी घेतली आहे. श्री. वि.गो. मराठे हे नाव छापले गेले. वि.के. मराठे हे हवे होते. चुकीबद्दल क्षमस्व !

**– संपदिका**

# आम्ही म्हातारे !!!

**- वा.ग. मराठे (पृ.५०३)**

हो ! मी पण म्हाताराच आहे. तरीसुद्धा मनाने तरुणच आहे. तुम्ही पण तरुण राहाण्याचा प्रयत्न करा. बरं का !

विशेषत: म्हातारा म्हटला की त्या माणसाविषयी कांहीतरी गैरसमज निर्माण होतात. त्याच्याबद्दल, तर्कवितर्क करण्यास सुरुवात होते. त्यापैकी एक म्हणजे तो माणूस चक्रम असावा. हेकेखोर व आठ्या पाडून बोलणारा,प्रकृतिची नेहमी तक्रार करणारा, 'कोण ही महागाई, आमच्यावेळी....' वगैरे सतत भुणभुण करणारा आणि पेपरात डोके खुपसून उगाचच देशाची काळजी वाहाणारा असेंच चित्र डोळ्यांसमोर उभे राहाते.

ह्या लोकांचा उपद्रव घरांतील माणसांना होतोच. परंतु आजूबाजूच्या माणसांनाही होतोच. त्यापेक्षा त्यांच्या सौ. असतील तर अधिकच ! कारण बाहेर असह्य उकाडा असला तरी ह्यांना स्वेटर घालावासा वाटतो. पण मग त्यावेळी जर का स्वेटर मिळाला नाही तर सौ. ना मात्र नको तेवढा मनस्ताप होतो. जरा दाढी वाढली तरी त्यांनाच त्यांचे खुंट बोचकारतात. जाड भिंगाच्या चष्म्यातून चिमी दिसली तरी ओळख नसल्यासारखे बारीक नजरेने खोदून खोदून विचारतात, 'तू जोश्यांची चिमीच का ?'

औषधांच्या गोळ्या जवळ असल्या तरी शेजारी माणूस असल्यावर त्यांना त्या गोळ्या उशाशी असूनही सांपडत नाहीत.

सौ. चहा करायला गेल्यावर ह्यांना कॉफी प्यावीशी वाटते. अंगात ताप नसला तरी ताप असल्यासारखे भासते.

'अहो नाही.'

'नाही कसं ? जरा थर्मामीटर लावून बघूया का ?'

'कशाला ? हाताला जरा देखील जाणवत नाही' कुणाचा तरी फोन आला तरी ह्यांना वाटते आपलाच फोन आला असावा !

टी.व्ही. वर 'फ्लाइट लेट आहे' असे म्हटल्यावर आपल्याच मुलाचे फ्लाइट लेट आहे असे यांना वाटते.

केव्हातरी पहाटे कुठेतरी बंबाचा आवाज आला तर 'आपल्याच सोसायटीत आग नाही ना लागली !' अशी उगाचच भीती यांना वाटत राहते.

दररोज कुठे ना कुठे संप, मारामारी, लाठीमार, हरताळ अशा बातम्या... असतातच. मग आता भाजी मिळणार नाही. एवढेच काय, तर उद्या पाणी कमी येणार म्हणून चारचारदा घरांत फेऱ्या मारून जे जे भांडे मिळेल तें तें भरून ठेवावेसे वाटते.

''अहो, तुम्हाला फरसाण चालत नाही. ते खाऊ नका.'' अशी सौ. ची ताकीद असूनहि फरसाणाचे बोकणे भरत असतात.

''मला सांगा हे बरं का ? मी शेंगदाणे भाजून ठेवते. पण मला जेव्हां हवे असतात तेव्हा मात्र डबा रिकामाच असतो. मग मात्र रात्री खोकला येतो, उबळ येते, कांही कांही विचारू नका.'' सौ. ची रास्त तक्रार. ''एकदां का खोकल्याची उबळ आली कीं मग मात्र झोप ह्यांनाही येत नाही आणि त्याबरोबर मलाही. अहो रात्रीं तीन साडेतीन वाजता उठून बसतात. मग म्हणतात चहा करतेसं का ? झोप येत नाही म्हणून का चहा प्यांयचा ? उगाचच जुन्या जुन्या गोष्टींची उजळणी करत असतात.कितीदां तरी सांगितले. अहो जाऊ दे. झाले ते झाले. कशाला उगाळत बसता ?''

''आमच्या लहानपणी आम्ही कितीतरी भुपाळ्या म्हणत असुं. तुला येतात का त्या ?''

''हो. येतात ना. अहो आम्ही तर पहाटे काकड आरतीलाही जात असूं. पण आता काय ! आता सगळाच गोंधळ. आणि दिवट्या तर तुम्ही पाजळल्यातच. आणि दिवे !''

''अहो, दिवे तर पोरांनी नाही का लावले ? चिरंजीव गेले परदेशी आणि तुम्हांला नाही का आणली काठी ? आठवण ती तेवढीच !''

''होय. श्रीराम श्रीराम,
तुला पांडुरंगा सांगतो एक
कधी मारशील हांक
नको झांज चिपळ्या
नको तीर्थयात्रा
इथे मीच हा असा
सोडितो उसासा''

''अहो. चला, चहा घेता ना ?''

''हो ! पण - पण मला आधी पाणी दे.''

''आणते हं. घ्या पाणी आणि ढोसा चहा !''......

''अहो हे काय ? उठता ना ! डुलकी लागली की काय ? अहो, उठा !''

झालं. संपलच सारं, अग बाई, खरोखरच आला का पांडुरंग ! उठा !

अशी ही खरोखरीच जाण्याची वेळ आली आणि हा संवाद ही कायमचा संपला !

❑❑❑

**मानसन्मान**

## डॉ. गिरीश जाखोटिया यांचे अभिनंदन (पृ.१२८)

'मुंबई मराठी साहित्य संघा' तर्फे नवोदित साहित्यिक पुरस्कार डॉ. गिरीश जाखोटिया यांना मिळाला आहे. दि. २ नोव्हेंबरला संघाच्या वर्दापनादिनी डॉ. अ.ना. भालेराव नाट्यगृहात साहित्य संघाच्या साहित्य गौरव पुरस्कारांचे वितरण होणार आहे. 'मारवाड्याची गोष्ट' लिहिणारे जाखोटिया हे मराठ्यांचे जावई आहे. मराठा प्रतिष्ठान तर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन.

(म.टा. २७ ऑक्टोबर २००८) वरून

**श्रद्धांजली**

## कै.शरदराव मराठे

सिकॉमचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ शरद मराठे यांच्या निधनाने कॉर्पोरेट जगतातील एक मराठी दुवा निखळला आहे. कॉर्पोरेट जगतात त्यांनी आपला ठसा उमटविला होता, तसेच त्यांची या क्षेत्रात नेहमीच उठबस असे. आता त्यांच्या तोडीचा कॉर्पोरेट क्षेत्रातील मराठी माणूस सापडणे कठीण आहे. नव्याने स्थापन झालेल्या आय.डी.बी.आय. बँकेचे ते पहिले अध्यक्ष होते. अनेक कंपन्यांच्या संचालकपदी होते. वयाच्या ८६व्या वर्षांपर्यंत ते सक्रिय होते. मराठे प्रतिष्ठान तर्फे त्यांना श्रद्धांजली.

प्रेमळ पित्याचे पुण्यस्मरण

# कै. विष्णू नारायण मराठे

**लेखक : सदानंद विष्णू - घराणे क्रमांक ५२(वेंगुर्ले)**

**वंशावळ पृष्ठ क्रमांक - ४१४**

कै.श्री.विष्णू नारायण मराठे यांचे श्री.सदानंद मराठे हे द्वितीय चिरंजीव आहेत. त्यांचा जन्म दि.१७ सप्टेंबर १९५२चा. ते एम्.कॉम (कॉस्टिंग) आहेत. प्रथम मुंबईतील शेअर बाजारातील प्रमुख कार्यालयात, अकाउंटस् ऑफिसर म्हणून त्यांनी काम केले. नंतर पटेल रोडवेज मध्ये अकाउंटस् मॅनेजर स्वेच्छानिवृत्ती घेऊन सध्या 'गुंतवणूक सल्लागार' म्हणून ते व्यवसाय करतात. पुढील लेखात त्यांनी वडिलांच्या गौरवशाली कार्याचा घेतलेला आढावा वाचकांना निश्चित प्रेरणादायी ठरेल.

## वडीलांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन

दिवाळीच्या सुट्टीची चाहूल लागली आणि आपण कुठेतरी बाहेर जाऊया अशी मागणी माझ्या मुलीने केली. मी हैदराबादला जाण्याचा बेत ठरवला. हैदराबाद का? असे तिने विचारताच, तुला एक गंमत दाखवायची आहे असे तिला सांगितले.

ठरल्याप्रमाणे आम्ही हैदराबादला पोहचलो. दुसऱ्या दिवशी सकाळी उठून सिकंदराबादला गेलो. सिकंदराबादला 'रेल निलायम' या भव्य इमारती समोर मोटार उभी राहिली. आम्ही इमारतीच्या जवळ गेलो. इमारतीवर, ही इमारत १९७३ साली पूर्ण झाली, ही रेल्वेची एक विशाल वास्तू आहे. त्यावर हेलीकॉप्टर उतरविण्याची सोय आहे. या वास्तूचे इंजिनियर V.N. Marathe अशी पाटी वाचल्यावर माझी पत्नी व मुलगी चकित झाल्या. ३५ वर्षांपूर्वी बांधलेली भव्य, भक्कम व विशाल इमारत आजही सर्वांच्या मनात भरते. त्या काळी एक कोटी रुपये खर्च करून रेल्वेसाठी बांधली. हा माझा वडीलांचा सर्वात मोठा प्रॉजेक्ट होता.

## त्यांनी केलेली महत्त्वाची कामे

बरौनी रिफायनरीज - बिहार; एच.एम.टी. - हैदराबाद; वारंगळ रिजनल इंजिनिअरींग कॉलेज - आंध्र; मराठा प्रेस - वरळी; साहित्य सहवास - वांद्रे (पूर्व); शिक्का नगर - गिरगाव; लोकमान्य नगर - माटुंगा; राम सेतू पूल - नाशिक; मराठे उद्योग भवन - प्रभादेवी; स्काऊट पॅव्हेलियन - शिवाजी पार्क; गाजलेल्या सिनेतारका उषा किरणचा पाली हिलवरील 'शुभं करोति' सुंदर टुमदार बंगला; पोद्दार कॉलेजचा डोम; जुने प्लाझा व अरोरा थिएटर्स

माझे वडील विष्णु नारायण मराठे यांचा जन्म ३० ऑगस्ट १९१८ रोजी सांगली येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सांगलीत झाले. माध्यमिक शिक्षण गिरगावातील युनियन हायस्कूल मध्ये झाले. त्यांचे गणित व विज्ञान हे विषय फारच आवडीचे होते. त्यामुळे मॅट्रीक पास झाल्यावर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमध्ये सायन्स शाखेत त्यांना सहज प्रवेश मिळाला.

पुण्यात राहून कॉलेजचे शिक्षण घेता घेता, त्यांनी व्यायाम, पोहणे, तसेच सकाळी उठून पळण्याचा सराव कधी सोडला नाही. इंटरसायन्सला असताना त्यांना त्यावर्षीचे **Gold Medal** मिळाले. तेथून पुढे त्यांनी पुणे इंडिनिअरींग कॉलेजला प्रवेश मिळवला. शिक्षण पूर्ण करताना त्यांना त्यांच्या वडीलांचा व मोठे बंधू दत्तात्रय मराठे यांचा पूर्ण पाठिंबा होता. वयाच्या दहाव्या वर्षी आईच्या मायेची पाखर हरविलेल्या वि.ना. मराठ्यांना, वडिलांनी ती उणीव कधीच भासू दिली नाही. त्यांनी देखील उत्तम प्रकारे सिव्हील इंजिनिअर होऊन, वडिलांना यश मिळवून दाखविले.

गणित विषयांचा अभ्यास पक्का असल्याने त्यांनी इंजिनिअरींग करताना **Slide Rule** कधीच वापरली नाही.

इंजिनियर झाल्यावर त्यांनी कामाची सुरुवात मनमाडला रेल्वे डिझाईन ऑफीसर नोकरी मिळवून केली. त्यांच्या कामातील नैपुण्य बघून त्यांना कसारा घाटातील रेल्वे पुलांचे डिझाईन करण्याची संधी दिली गेली. ती कामगिरी उत्कृष्ट झाल्याने त्यांची बदली रेल्वेच्या मुंबई येथील मुख्यालयात झाली.

१९४४ साली त्यांचा विवाह वाटेगावच्या दिवेकरांच्या मुलीशी म्हणजे लीला दिवेकर हिच्याशी झाला. काही दिवस ते दोघे गिरगावातील चाळीत राहिले. नंतर माहिमच्या गोरेवाडीत राहण्यास आले. वडिलांच्या व्यवसायात अनेक चढउतार आले. पण माझ्या आईने मोठ्या धैर्याने त्यांना साथ दिली. सर्व प्रकारे कष्ट सोसण्यात तिने कधीही तक्रार केली नाही. माझ्या आईने सदैव हसतमूख राहून आम्हा पाचही भावंडांचे संगोपन केले. आम्हा सर्व भावंडांना शिक्षणाचे महत्त्व व पुस्तक मैत्री जोपासण्याचे धडे आई वडिलांमुळे मिळाले.

१९४६ साली माझ्या मोठ्या भावाचा जन्म झाला. मुलाच्या बारशाला सोन्याची साखळी करण्यासाठी वडिलांनी त्यांचे Gold Medal मोडले. पण देव पाठीशी सदैव असतो. वडिलांचे कष्ट व त्याग वाया गेले नाहीत. पुढे मोठा झाल्यावर माझ्या मोठ्या भावानेही इंडिनिअरींग मध्ये चांगल्या प्रकारे उत्तीर्ण होऊन Gold Medal मिळवले. धन्य ते माता-पिता !

नोकरी सोडून वडिलांनी स्वत:च Building Contractor & R.C.C. Designer चा व्यवसाय सुरु केला. त्यांच्या हाताखाली काम करणारी बहुतेक सर्व मराठी माणसे होती. त्यातील दहा ते बारा माणसे नंतर खूपच नावारुपास आली.

वडिलांची हुशारी, मेहनत, जिद्द व त्याला आमच्या आईची सर्व प्रकारे कष्ट करण्याची तयारी, समाधानी वृत्ती याची जोड लाभल्याने त्यांच्या वयाच्या केवळ ४०व्या वर्षी वांद्रा पश्चिम मुंबई येथे लिंकींग रोड वर स्वत:च्या मालकीची दोन मजली इमारत उभी राहिली. मातृदेवो भव - पितृदेवो भव हे सदैव मनात जपणाऱ्या माझ्या आई वडिलांनी स्वत:च्या घराला नाव ही दिले 'राधा-नारायण', जी वास्तू आजही अभिमानाने ताठ उभी आहे. मी व माझा धाकटा भाऊ आमच्या कुटुंबासह आज या वास्तूतच राहतो. आज आईवडिल हयात नाहीत पण या वास्तूच्या रुपाने त्यांच्या प्रेमाची पाख आमच्यावर नक्कीच आहे.

विशेष म्हणजे त्यांच्या पुणे इंजिनिअरींग मधल्या मित्रांनी ग्रॅज्युएशनची पन्नाशी व साठी दोनदा एकत्र भेटून साजरी केली. ग्रॅज्युएशनचे साठावे वर्ष कॉलेजच्या प्राचार्यांसोबत साजरे केले. त्या सर्व मित्रांनी मिळून सिव्हील इंजिनिअरींगमध्ये शेवटच्या वर्षात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला लावलेले त्या वर्षीचे पहिले बक्षिस माझ्या वडिलांच्या नातवानीच पटकावले. अशा रितीने तिन्ही पिढ्यांनी सिव्हील इंजिनिअरींगमध्ये घवघवीत यश मिळविले.

त्यांनी त्यांचे उर्वरित आयुष्य, वयाच्या ८३ वर्षा पर्यंत समाज कार्यात व मुलामुली, सुना, जावई, नातवंडासोबत सुखासमाधानाने व्यतीत केले.

❑❑❑

## सामान्यज्ञान स्पर्धा

# कै. चिंतामण बळवंत मराठे यांच्या स्मरणार्थ

**प्रेषक**
श्री. गजानन चिंतामण मराठे (पृ.१२९)
प्लॉट नं. ३४अ, 'सार्थक'
सेनादत्त कॉलनी,
पुणे - ४११०३०.
दूरध्वनी : २४५३१६५१

**विषय : कै. चिंतामण बळवंत मराठे यांच्या स्मरणार्थ**

## सामान्यज्ञान स्पर्धा

**स्पर्धेचे नियम व अटी पुढीलप्रमाणे.**

१. स्पर्धेत मराठे परिवारातील व्यक्ती भाग घेऊ शकतात.
२. वयाची अट नाही.
३. स्पर्धकांनी त्यांची उत्तरे एका शब्दात काळ्या शाईने लिहून पाठवणे.
४. जर जास्त उत्तरे बरोबर आल्यास लकी ड्रॉ काढून बक्षीस वितरण केले जाईल.
५. मराठेंच्या माहेरवाशीणी स्पर्धेत भाग घेवू शकतात.
६. स्पर्धेतील बक्षीसे पुढीलप्रमाणे
   १. पहिले बक्षिस रु.५००/-
   २. दुसरे बक्षिस रु.३००/-
   ३. तिसरे बक्षिस रु.२००/-
७. स्पर्धकांनी त्यांची उत्तरे वरील पत्त्यावर ३१ जानेवारी २००९ पूर्वी पाठवावी. त्यानंतर आलेल्या उत्तरांचा विचार केला जाणार नाही. स्पर्धेच्या निकाल मार्च २००९ च्या अंकात प्रसिद्ध केला जाईल व स्पर्धकांना त्यांची बक्षिसे एप्रिल २००९ पूर्वीच त्यांच्या पत्त्यावर पाठविली जातील.
८. स्पर्धकांनी आपले संपूर्ण नांव, जन्मतारीख, वय, घरचा पूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक कळवणे आवश्यक आहे.
९. आलेली उत्तरे तज्ज्ञ परिक्षकांमार्फत तपासली जातील.

१. भारताचे पहिले उपराष्ट्रपती कोण ?
२. भारत प्रजासत्ताक किती साली झाला ?
३. टेलिफोनचा शोध कोणी लावला ?
४. गुरुत्वाकर्षणाचा शोध कोणी लावला ?
५. कामगार दिन कोणत्या तारखेला येतो ?
६. सिग्नल याला मराठी शब्द काय ?
७. मोबाईल याला मराठी शब्द काय ?
८. महाराष्ट्राचा छोटा गडकरी कोणास म्हणतात ?
९. केशवसुत या कवीचे मुळ नाव काय ?
१०. भारताने पहिली टेस्ट मॅच किती साली जिंकली ?
११. गीतरामायणाचे कवी कोण ?
१२. गीतरामायणाला ५० वर्षे किती साली झाली ?
१३. गीतरामायणाचे संगीतकार कोण ?
१४. मुंबईचे महापौर कोण ?
१५. गीतरामायणात एकूण गीते किती ?
१६. अखेरचे बंड या कादंबरीवर कोणते नाटक लिहिले ?
१७. कोणत्या नाटककाराला ९ हा अंक शुभ होता व त्याची सर्व बहुतेक नाटके ९ अक्षरी आहेत ?
१८. आर्यसमाजाचे संस्थापक कोण ?
१९. सकाळ वृत्तपत्राचे जनक कोण ?
२०. कोणत्या मराठी चित्रपटाला राजा परांजपे, सुधीर फडके, व ग.दि. माडगूळकर यांनी एकत्र काम केले आहे ?
२१. भारताने वर्ल्डकप किती साली जिंकला ?
२२. स्नेहल भाटकर या संगीतकाराच्या मुलाचे नाव काय ?
२३. राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष कोण ?
२४. अटलबिहारी वाजपेयी १३ दिवसांचे पंतप्रधान कोणत्या साली झाले ?
२५. भारताच्या पहिल्या स्त्री पंतप्रधान कोण ?
२६. स्वरराज ही पदवी कोणत्या गायकास दिली ?
२७. महाराष्ट्राचा डॅनीके ही पदवी कोणत्या मराठी नटास दिली आहे ?
२८. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री कोण ?
२९. लोकसभा बरखास्त करण्याचे अधिकार कोणास आहेत ?
३०. कवी अनिल यांचे पूर्ण नाव काय ?
३१. आयडॉल्स् या पुस्तकाचे लेखक कोण ?
३२. ती फुलराणी या नाटकाचे गीतकार व संगीतकार कोण ?
३३. शरद तळवलकर यांच्या बंधूचे नाव काय ?
३४. प्रभात चित्रपट संस्थेचे संस्थापक कोण ?
३५. 'पण लक्षात कोण घेतो' या मराठी कादंबरीवरून कोणत्या पंतप्रधानांनी त्यांचे तेलगुमध्ये भाषांतर केले ?
३६. 'कूंकू' या चित्रपटाचे दोन दिग्दर्शक कोण ?
३७. मराठा वर्तमानपत्र कोणी सुरू केले ?
३८. चेन्नईचे मूळ नाव काय ?
३९. १४ ऑगस्टला कोणत्या देशाला स्वातंत्र्य मिळाले ?
४०. मास्टर ब्लास्टर हे टोपण नाव कोणत्या खेळाडूचे आहे.

४१. मुलगा, सून व वडिल या तिघानी एकत्र एका मराठी ऐतिहासिक नाटकात काम केले आहे, त्या नाटकाचे नाव काय ?
४२. महानंदा कादंबरीचे लेखक कोण ?
४३. धाकटी पाती कोणत्या मराठी कलावंतास म्हणतात ? त्या कलावंतांचे नाव काय ?
४४. माणिक वर्मा या गायिकेच्या चारही मुलींची नावे काय ?
४५. चादरीकरिता प्रसिद्ध असलेल्या शहराचे नाव काय ?
४६. जन गण मन या राष्ट्रगीताचे कवी कोण ?
४७. सनी डेज् या पुस्तकाच्या लेखकाचे नाव काय ?
४८. ग.दि. मागडूळकरांच्या भावाचे नाव काय जे लेखक होते ?
४९. जय जवान जय किसान ही घोषणा कोणी दिली ?
५०. गुलाबी शहर कोणत्या शहरास म्हणतात ?
५१. व्ही.टी. स्टेशनचे नवीन नाव काय ?
५२. 'गगनी उगवला सायंतारा' या पुस्तकाचे लेखक कोण ?
५३. १९८३च्या वर्ल्ड कपमध्ये भारताचा उपकर्णधार कोण होता ?
५४. भारतीय राष्ट्रध्वजाचे तीन रंग कोणते ?
५५. कऱ्हाड हे गाव कोणत्या उपपंतप्रधानाचे आहे ?
५६. नांदेड शहराचे माजी गृहमंत्री कोण ?
५७. सुनील गावसकरच्या मेव्हण्याचे नाव काय ?
५८. मराठ्याचे गोत्र कोणते ?
५९. पुण्यात महापूर किती साली आला ?
६०. सुती कापडाच्या गिरण्याचे शहर कोणते ?
६१. चपराशाच्या मुख्यमंत्री, राज्यपाल व सध्या केंद्रात मंत्री आहेत त्यांचे नावे काय ?
६२. काका व पुतणे सध्या दिल्लीच्या व महाराष्ट्राच्या राजकारणात आहेत त्यांची नावे काय ?
६३. गीतगोपाळ हे काव्य कोणी लिहिले ?
६४. महाराष्ट्राची उपराजधानी कोणती ?
६५. 'तरुण तुर्क व म्हातारे अर्क' या नाटकाचे लेखक कोण ?
६६. गानकोकिळा कोणत्या गायिकेस म्हणतात ?
६७. पोलादाचा कारखाना कोणत्या शहरात प्रसिद्ध आहे त्या शहराचे नाव काय ?
६८. दत्तो वामन पोतदार हे नाव कोणत्या विषयाकरता प्रसिद्ध आहे ?
६९. 'नटसम्राट' हे नाटक कोणी लिहिले आहे ?
७०. महात्मा गांधींचा खून कोणी केला ?
७१. रजनीश आश्रम कोणत्या गावात आहे ?
७२. आपल्या राज्यघटनेचे शिल्पकार कोण आहेत ?
७३. पाकिस्तानने वर्ल्ड कप किती साली जिंकला ?
७४. सलामीला फलंदाजीला येऊन शेवट पर्यंत नाबाद राहिलेल्या क्रिकेटरचे नाव काय ?
७५. टिटवाळा हे गणपतीचे ठिकाण कोणत्या जिल्ह्यात आहे ?
७६. देशात आणीबाणी किती साली आली ?
७७. जवाहरलाल नेहरुंच्या नातावांची नावे काय ?
७८. दोन ऑक्टोबर हा दिवस कोणत्या दोन नेत्यांकरिता प्रसिद्ध आहे ?
७९. कोणत्या संगीतकाराचा मुलगा व पत्नी गायक आहेत ?
८०. काळे पाणी या कादंबरीचे लेखक कोण ?
८१. संत्र्यांचे प्रसिद्ध शहर कोणते ?
८२. सोनिया गांधी यांच्या सासूचे नाव काय ?
८३. लखोबा लोखंडे हे कोणत्या कलाकाराच्या भूमिकेचे नाव आहे ?
८४. गारंबीचा बापू या नाटकाचे लेखक कोण ?
८५. डॉक्टर हि पदवी असलेले मराठीतील चार कलाकारांची नावे सांगा ?
८६. माझी जन्मठेप ही कादंबरी कोणी लिहिली?
८७. महामहोपाध्याय ही पदवी महाराष्ट्रात कोणास देण्यात आली?
८८. अरुण दाते या गायकाचे मूळ नाव काय?
८९. ज्ञानेश्वरांचे आडनाव काय?
९०. व्ही. शांताराम यांचे आडनाव काय?
९१. महाराष्ट्राचे महसूल मंत्री कोण?
९२. स्मिता पाटील या अभिनेत्रीने कोणत्या कलाकाराबरोबर विवाह केला?
९३. सध्या गाजत असलेल्या सारेगपम या स्पर्धेत कोणता सिनेकलाकार उपविजेता ठरला?
९४. कोल्हापूर या शहराचे रेल्वेने बदललेले नाव काय?
९५. वसंत कानेटकर यांच्या वडिलांचे नाव काय?
९६. केसरी या वर्तमानपत्राचे सध्याचे संपादक कोण?
९७. श्रीशैलम कोणत्या राज्यात आहे?
९८. मदुराई हे शहर कोणत्या राज्यात आहे?
९९. अंबेजोगाई कोणत्या जिल्ह्यात आहे?
१००. सिनेमा टॉकीजमध्ये बुकिंग क्लार्कचे काम करणाऱ्या कलाकाराचे नाव काय?

❑❑❑

## नांदा सौख्यभरे

सौ. वर्षा व श्री. विलास वासुदेव दातार यांची सुकन्या चि. सौ. कां. श्रुती हिचा विवाह चि. अमोल कमलाकर गोसावी यांच्याबरोबर गुरुवार दि. ६ नोव्हेंबरला दुपारी १२ वाजून ४७ मिनिटांच्या शुभमुर्हूतावर लोकमान्य सभागृह, माटुंगा येथे थाटामाटात संपन्न झाला. वधूवरांना मराठे प्रतिष्ठानतर्फे हार्दिक शुभेच्छा व शुभाशिर्वाद.

(मराठ्यांची माहेरवाशिण आणि प्रतिष्ठानाची सदस्य असलेली वासंती शिवराम मराठे, दादर यांची श्रुती ही सुकन्या आहे.)

ॐ

# मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८(मुं.) दि. १२.१.८१.
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५.
दूरध्वनी : २४३० २४५३; फॅक्स : ९१-२२-२४३७ ९८६३
e-mail:maratheparivar@yahoo.co.in

२६ वा वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके
१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८

## वार्षिक सर्वसाधारण सभा :

रविवार दि. २८ डिसेंबर २००८ सायंकाळी ५.०० वा.

**सभास्थान:**
दामले योगकेंद्र सभागृह, मनमाला टँक रोड, लोकमान्यनगर हॉलजवळ, माटुंगा रोड (प.रे.), मुंबई ४०० ०१६

### विश्वस्त मंडळ



| | | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृपृ |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २. | श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त | ९५२५१ २४७ ०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| ३. | डॉ. राजेंद्र विठ्ठल मराठे | विश्वस्त | २५४२ १८९१ | ठाणे-प. | २९१ |
| ४. | श्री. सतीश काशिनाथ मराठे | विश्वस्त | २४४५ ८६४६ | दादर-प. मुंबई | १२९ |
| ५. | श्रीम. सुलभा सुरेश मराठे | विश्वस्त | २४४४ ३०७४ | माहिम, मुंबई | ३९९ |

**कार्यकारी मंडळ**

| | | | दूरध्वनी | वास्तव्य | कुवृपृ |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. आनंद यशवंत मराठे | विश्वस्त-कार्याध्यक्ष | २५४२ ५५२४ | ठाणे-प. | २७७ |
| २. | श्री. रमाकांत माधव विद्वांस | सभासद | २४३० ५२६० | माहीम, मुंबई. | ६२३ |
| ३. | श्री. मोहन सदाशिव मराठे | सभासद | २६४६ ४३५१ | खारा-प, मुंबई. | ३६५ |
| ४. | श्री. हेमंत अरुण मराठे | सहकार्यवाह | ९५२५० २४३३०३८ | नालासोपारा | ०२१ |
| ५. | श्री. प्रभाकर दामोदर मराठे | कोषाध्यक्ष | २४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| ६. | श्री. विनायक केशव मराठे | कार्यवाह | २४३० ३३२९ | वरळी, मुंबई | ०२० |
| ७. | श्री. लक्ष्मण शंकर मराठे | सभासद | २५६८ ०१०४ | मुलुंड-पूर्व, मुंबई | ५२० |
| ८. | श्री. सीताराम गोपाळ खांबेटे | सभासद | २६८३ ६९९४ | अंधेरी-पूर्व, मुंबई | ६७६ |
| ९. | श्री. प्रमोद कृष्ण मराठे | सभासद | २५४७ ७५११ | ठाणे | ६७६ |
| १०. | श्री. चिंतामण महादेव मराठे | सभासद | २४१५ ५३९० | परळ, मुंबई | २२२ |
| ११. | सौ. अदिती यशवंत मराठे | सभासद | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई | ३९९ |
| १२. | सौ. वर्षा शरद मराठे | सभासद | २८४१ ६७८७ | गोरेगाव | ०२१ |
| १३. | सौ.सुमेधा प्रभाकर मराठे | सभासद | २४१५ ०८८९ | वडाळा, मुंबई | १२० |
| १४. | श्री. अरुण दत्तात्रय मराठे (पुणे) | सभासद | ९५२० २४४७ ३२८९ | पुणे | ०६१ |
| १५. | श्री. अरविंद दामोदर मराठे | विश्वस्त-कायमनिमंत्रित | ९५२५१ २४७०६७७ | डोंबिवली-पू. | २९२ |
| १६. | श्री. यशवंत सुरेश मराठे | कायम निमंत्रित | २४४४ ९२७४ | माहिम, मुंबई | ३९९ |
| १७. | श्री. वामन गणेश मराठे | कायम निमंत्रित | २८२६ ९४०२ | जोगेश्वरी-पू मुंबई | ५०३ |
| १८. | श्री. सुरेश मराठे | सभासद-कायम निमंत्रित | ९५२५१ २४९ ४९५७ | डोंबिवली-पू.मुंबई | ५०३ |
| १९. | सौ. नीलांबरी रमेश मराठे | कायम निमंत्रित | ९५२० २४४५ ६२७० | पुणे. | २८० |



**बँकर्स**
सारस्वत बँक, प्रभादेवी, मुंबई
युको बँक, टिळक रोड, पुणे

**लेखा-परीक्षक**
श्री.चंद्रकांत वामन मराठे, ठाणे. (सनदी लेखापाल).

## मराठे प्रतिष्ठान

### वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

मराठे प्रतिष्ठानची पंचविसावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ डिसेंबर २००८ रोजी सायंकाळी ५.०० वा. दामले योगकेंद्र सभागृह, लोकमान्यनगर सभागृहाजवळ, मनमाला टँक रोड, माटुंगा रोड, (प.रे.), मुंबई ४०००१६ येथे आयोजित केली आहे.

**सभेपुढील कामे :**

१) दि. २२ जुलै २००७ रोजी झालेल्या पंचविसाव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून मंजूर करणे.
२) दि. ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाचा प्रतिष्ठानचा अहवाल, ताळेबंद व जमाखर्च संमत करणे.
३) सन २००८-०९ च्या हिशेब तपासनीसांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन निश्चित करणे.
४) सभासदांकडून आलेल्या पत्रांवर, प्रस्तावांवर तसेच प्रतिष्ठानच्या भावी कार्यक्रमांवर विचार विनिमय करणे.
५) अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या कामांचा विचार करणे.

कार्यकारी मंडळाच्या आदेशावरून
**श्री. मोहन सदाशिव मराठे**
कार्यवाह

**१ डिसेंबर २००८**

**टीपा :**

१) गणसंख्येच्या अभावी ही सभा तहकूब झाल्यास ती पुन्हा त्याच दिवशी सायंकाळी ५.३० वा. त्याच ठिकाणी भरेल.
२) वार्षिक अहवाल व हिशेब पत्रके सोबत दिली आहेत. काही खुलासा हवा असल्यास सभेच्या ७ दिवसाअगोदर समक्ष किंवा पत्राने /ई-मेलने विचारावा.
३) प्रतिष्ठानच्या कार्याबद्दल प्रस्ताव, ठराव किंवा सूचना करावयाच्या असल्यास सभासदांनी त्या सभेच्या ७ दिवस अगोदर कार्यालयात किंवा ई-मेलने पाठवाव्यात. (e-mail:maratheparivar @yahoo.co.in)
४) मराठे प्रतिष्ठानच्या कार्यकारी मंडळाची तीन वर्षाची मुदत या सभेच्या दिवशी संपते. या मंडळावर सदस्य म्हणून काम करण्याची इच्छा असलेल्या सभासदांनी सभेअगोदर पत्र पाठवून तसे कळवावे.
५) सभेला येताना या अहवालाची प्रत आणावी.
६) सभेनंतर अल्पोपहाराची व्यवस्था आहे.

## मराठे प्रतिष्ठान

पंचविसावा वार्षिक अहवाल
व हिशेब पत्रके
(१ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८)

सभासद बंधू भगिनीनो,

मराठे प्रतिष्ठानच्या दि. ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या वर्षाचा म्हणजेच २६वा वार्षिक अहवाल कार्यकारी मंडळ सादर करीत आहे.

### सभासद :

वृत्तांतसाली आजीव सदस्य संख्या (१३६०) ३३ ने वाढून १३९३ झाली. आश्रयदाता संख्या (१९) १ ने वाढून २० झाली. हितचिंतक संख्या (७) १ ने वाढून ८ झाली व सन्माननीय सदस्य संख्या (३) कायम राहिली. या वर्षीच्या सर्व नवीन सदस्यांचे प्रतिष्ठान स्वागत करीत आहे. 'हितगुज' तहहयात वर्गणीदार संख्या (१०७०) ३० ने वाढून ११०० पर्यंत पोहोचली. प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यत्वासाठी प्रत्येक सज्ञान स्त्रीपुरुष व्यक्तीने किमान रु.१०० शुल्क पाठवावे व प्रत्येक कुटुंबासाठी कुटुंबप्रमुख सदस्याने रु.२०० 'हितगुज' तहह्यात वर्गणी आमचेकडे पाठवून प्रतिष्ठानला सहकार्य करावे. यासाठीचा अर्जाचा नमुना अन्यत्र दिला आहे. (परिशिष्ट-अ). शिवाय हा नमुना प्रतिष्ठानच्या http://marathepratishthan.org या वेबसाईटवरही सभासद या सदरामध्ये उपलब्ध आहे. आजीव सदस्यत्व त्या व्यक्तीच्याच फक्त तहह्यात असते. नवीन पिढीचे आजीव सदस्यत्व स्वीकारून प्रतिष्ठानला सहकार्य करावे.

### वार्षिक सर्वसाधारण सभा –

प्रतिष्ठानची २५वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दि. २२.७.२००७ रोजी सायंकाळी ५ वाजता दामले योग केंद्र सभागृह माटुंगा (प.) या ठिकाणी भरली होती. सभेचे अध्यक्षस्थान प्रतिष्ठानचे कार्योपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांनी भूषविले. सभासदांची उपस्थिती समाधानकारक होती. या सभेत मागीलसभेचे इतिवृत्त तसेच हिशेब पत्रके मंजूर झाल्यावर प्रतिष्ठानच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.

हितगुजच्या स्वरुपाविषयी श्री. सी.गो. खाबेटे, वि.के. मराठे व श्री. ल.श. मराठे यांनी आपले विचार व्यक्त केले. निवृत्त पोस्ट कर्मचारी व युनियनचे अध्यक्ष श्री. दिनकर रामचंद्र मराठे यांनी आपल्या भाषणात प्रतिष्ठानाच्या कार्याला अुपयुक्त असे मोलाचे मार्गदर्शन पर विचार व्यक्त केले.

याच सभेत २००७-०८ ते २००९-१० या तीन वर्षासाठी नवीन कार्यकारीणीची निवड करण्यात आली.

अहवालासाठी परिवारातील विशेष उल्लेखनीय यश मिळविलेल्या व्यक्तींच्या गौरवास्पद कामगिरीची अध्यक्षांनी नोंद घेऊन त्यांना अधिकाधिक यशासाठी सदिच्छा दिल्या. परिवारातील व्यक्तींनी विशेष यश संपादन केलेले प्रतिष्ठानला कळविल्यास त्याचा हितगुजमध्ये मानसन्मान या सदरातून वेळोवेळी यथायोग्य उल्लेख करण्यात येतो. अहवाल सालातील अशा काही नोंदी येणेप्रमाणे.

१. कोल्हापूर येथील सदस्य श्री. सदानंद दिनकर उर्फ नंदकुमार मराठे (पृ.२१९) यांना, समृद्ध प्रतिष्ठानतर्फे 'समाजरत्न' हा राज्यस्तरीय पुरस्कार, शिक्षण राज्यमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

२. सौ. नीलिमा पटवर्धन, आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेती.

श्री. श्री. व्यं. मराठे (पृ.४३) यांची कन्या सौ. नीलिमा पटवर्धन या सध्या आकाशवाणी पुणे केन्द्र येथे प्रसारण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

एशिया पॅसिफिक इन्स्टिट्यूट फॉर ब्रॉडकास्टिंग डेव्हलपमेंट या संस्थेतर्फे देण्यात येणारा सर्वोत्कृष्ट समाजहितपर जाहिरातीचा पहिला पुरस्कार जाहीर झाला. 'स्त्री भ्रूण हत्या' या विषयावर तयार केलेल्या इंग्रजी जाहिरातीला हा पुरस्कार देण्यात आला.

३. श्री. श्रीधर मराठे (पृ.३९६)

पु.भा. भावे स्मृती पत्रकारिता पुरस्कार श्री. श्रीधर मराठे (किरातकार्य) यांना ता. १२.८.०७ रोजी देण्यात आला.

४. अभिषेक मराठे व रसिका मराठे यांचे विदेशगमन.

पुण्याचे सदस्य श्री. श्रीकांत माधव मराठे (पृ.२११) यांचे नातू चि. अभिषेक यांनी मुंबई विद्यापीठाची B.E. Comp ही पदवी घेऊन या दोन वर्षाच्या उच्च शिक्षणासाठी बोस्टन (U.S.A.) येथे प्रयाण झाले. तसेच कु. रसिका मराठे यांनी फर्ग्युसन कॉलेजतर्फे आयोजित १३ दिवसांच्या शैक्षणिक सहलित भाग घेऊन फ्रान्स, बेल्जियम, इटली, ऑस्ट्रिया, नेदरलँडस्, जर्मनी या देशांचा यशस्वी व अनुभवसंपन्न अभ्यासदौरा केला.

५.) कु. चैत्रा माधव मराठे (पृ.६९). हिला कॅलिफोर्निया युनिव्हर्सिटीची पीएच.डी. प्रतिष्ठानचे ज्येष्ठ सदस्य आणि कुलवृत्तांत आवृत्ती २ चे संपादक, श्री. वि.गो. तथा भाऊसाहेब मराठे यांची नात, कु. चैत्रा हिने युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्नियाच्या लॉस एंजिलिस (VCLA) येथील आलापनेमधून मॉलिक्यूलर बॉयोलॉजी या विषयातील संशोधनासाठी पी.एच.डी. ही पदवी संपादन केली आहे. तिने यापूर्वी याच विषयात सॅनडियागो आल्पापनेमधून बॅचलरची पदवी मिळविली होती.

श्री. भाऊसाहेबांची दुसरी नात कु. नेहा मुकुंद मराठे हिने युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया बर्कली, येथून पॉलिटिकल सायन्स मध्ये बी.ए. केल्यावर पदव्युत्तर शिक्षण कायद्याच्या विषयात केले. आणि वेगळ्या वाटेवरची जे.डी. (डॉक्टर ऑफ जूरिस्पूडन्स) ही पदवी मिळविली तसेच 'बार' ची परिक्षा दिल्यामुळे कु. नेहा आता पूर्णपणे 'ऑटर्नी' झाली.

६) श्री संजय मराठे. (पृ.४१६). यांना सर्वोत्कृष्ट **क्रीडा कार्यकर्ते पुरस्कार** मुख्यमंत्र्यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. रोख रु.५००००/- स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरुप होते. जलतरण प्रबोधक पुस्तकाचे लेखक आहेत.

(टीपः मराठे परिवारातील मंडळींनी मिळविलेल्या उज्ज्वल यशाची माहिती प्रतिष्ठानकडे अवश्य पाठवावी म्हणजे आपले त्रैमासिक हितगुजमध्ये प्रसिद्धी दिली जाईल. - संपादिका)

मराठे प्रतिष्ठानचा पुणे शाखेचा २८वा वर्धापन दिन व दैनंदिनी २००८ चे प्रकाशन :

मराठे प्रतिष्ठान २८ वा वर्धापनदिन गांधर्व महाविद्यालयाच्या नवीन वास्तूत २५ डिसेंबर २००७ रोजी साजरा झाला.

कार्यक्रमाला विख्यात साहित्यिक ह.मो.

मराठे प्रमुख पाहुणे होते. त्यांच्या शुभ हस्ते दैनंदिनीचे प्रकाशन झाले. माठे प्रतिष्ठानचे अुपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस, संपादिका डॉ.सौ. सुमेधा प्रभाकर तसेच भाऊ मराठे अुपस्थित होते.

श्री. ह.मो. मराठे यांनी राजकारणातील गमतीदार किस्से सांगून मनोरंजन केले तर भाऊंच्या धक्क्याने हसून हसून पुरेवाट झाली. दोन्हीही कार्यक्रमात हास्यरसाच्या धबधब्याखाली बसले आहोत असे वाटते. विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात गुणवत्ता पारितोषिकेही देण्यात आली.

## गुणवत्ता पारितोषिके –

वार्षिक सभेनंतर पारितोषिक वितरण समारंभ झाला. यात, सन २००६-२००७ वर्षांच्या परीक्षांसाठी शिक्षणनिधीतून व अन्य योजनाअंतर्गत खालीलप्रमाणे गुणवत्ता पारितोषिके देण्यात आली.

१) प्राथमिक शिष्यवृत्ती - रु. १५०/-.

२) माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा अर्ज आले नाहीत.

३) माध्यमिक शालांत परीक्षा....

४) अुच्च माध्यमिक शालांत परीक्षा....

५) पदविका - पदवी - अुच्च पदवी इ. - रुपये १५००/-

एकूण पारितोषिके रु. ७२५०

याशिवाय खालील आपापल्या परीक्षेमध्ये मराठे परिवारात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष पारितोषिके देण्यात आली.

कै. कु. अनिता खांबेटे स्मृती योजने अंतर्गत रु. २५०/- प्रत्येकी

१) स्कॉलरशिप परीक्षा इ.४थी २५०

२) माध्यमिक शालांत परीक्षा २५०

३) उच्च माध्य. शा. परीक्षा २५०

एकूण पारितोषिके रु. ७५०

गणेश तांत्रिक शिक्षण

पारितोषिक व रु. ५००

हिंदी पारितोषिक रु.१००

## शैक्षणिक मदत

शिक्षणविषयी प्रतिष्ठान वरीलप्रमाणे पारितोषिके व गरजू विद्यार्थ्यांना मदत देत असते. आपल्या परिवारातील तरुणांना शिक्षण पुरे करण्यासाठी आर्थिक मदतीची गरज जरुरी भासत असेल तर विनासंकोच त्यांनी प्रतिष्ठानकडे आपली अडचण सांगावी.

## शिक्षण निधी

अहवालसाली या निधीमध्ये देणग्या रु.३१,००० व्याज रु.२९,३४६ ची भर पडली. गुणवत्ता पारितोषिकांसाठी रु.६,१०० वजा जाता वर्षअखेर रु.४,४५,५२५ शिल्लक आहेत. (गतवर्षी ३,९१,२७९).

## कायमनिधी :

अहवालसाली या निधीमध्ये ३३ आजीव सदस्यांचे व १ आश्रयदाता मिळून रु.४,८०० ची वाढ होऊन वर्षअखेर रु.१,८२,५९५ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.१,७७,७९५)

## कुलवृत्तांत निधी :

या निधीमध्ये व्याज रु.५७२ची भर पडून रु. ११,२०७ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.७,६३३)

आपल्या कुलवृत्तांताच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रती संपल्या आहेत. मागणीप्रमाणे झेरॉक्स प्रती उपलब्ध करून दिल्या जातात. कुलवृत्तांत अद्ययावतीकरणाचे काम चालू आहे. या कामी कार्यकारिणी सदस्य श्री. सीताराम गोपाळ खांबेटे (कु.वृ.पृ.६७६) यांना आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. आपणापैकी संगणक / ई-मेलद्वारा संपर्क साधू शकणाऱ्या परिवार सदस्यांच्या सोयीसाठी नुकताच maratheparivar@yahoo.co.in हा नवीन ई-मेल नोंदविण्यात आला आहे. आपण या मेलवर श्री. खांबेटे यांचेशी संपर्क साधून आपली माहिती देऊ शकता.

## कै. सुरेशभाऊ स्मृतिनिधी :

अहवालसाली या निधीमध्ये व्याज रु.५,६७८ ची भर पडून एकूण रु.८१,३८४ सालअखेर शिल्लक आहेत (गतसाली रु.७५,७०६)

## उद्योग प्रेरणा

उद्योग प्रेरणा या उपक्रमामध्ये प्रतिष्ठानला तरुणांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद मिळत नाही हे खेदाने नमूद करावेसे वाटते. तरुणांनी त्यांच्या अपेक्षा व सूचना प्रतिष्ठानपुढे अवश्य मांडाव्यात.

## उद्योग प्रवर्तन निधी

या निधीमध्ये व्याज रु. ३,५२८ ची भर पडून अहवालवर्षअखेर रु.५०,५३५ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.४७,००९)

## विशिष्ट हेतु निधी

अहवालसाली या निधीमध्ये व्याज रु. १०,०९५ भर पडून होऊन वर्षअखेर रु.१,४४,६९७ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.१,३४,६०२)

## वैद्यकीय मदत निधी

या निधीमध्ये देणग्या रु.५,५०० व व्याज रु.२,१८२ या मिळून व रु.१०,००० ची मदत वजा जाता अहवालसाल अखेर रु.२६,७७८ आहेत (गतसाली रु.२९,०९६). वैद्यकीय मदतीसंदर्भात प्रतिष्ठानकडे या निधीसाठी कुलबांधवांनी देणग्या दिल्यास त्याचा लाभ गरजू बांधवाना मिळवून देता येईल.

## युवामंचनिधी:

अहवालसाली या निधीमध्ये व्याज रु.९३ ने वाढ होऊन वर्षअखेर रु.१,३३७ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.१,२४४).

## हितगुज

कागदाचे, मुद्रणाचे व टपालाचे दर वेगाने वाढत असताना जाहिरातींच्या आधाराशिवाय हितगुज आपणापर्यंत पोहोचविण्याचे कठिण काम आम्ही कसेबसे करीत आलो आहोत. काटकसरीचा उपाय म्हणून मागील दोन वर्षे वार्षिक अहवाल व हितगुजचा अंक एकत्रित देण्याचा प्रयोग केला. मात्र हितगुज निधीला देणग्या देऊन व हितगुज अंकामध्ये आपल्या व्यावसायिक व वैयक्तिक जाहिराती देऊन किंवा अन्य मार्गाने आपण प्रतिष्ठानला मदत करावी, ही पुनश्च एकवार विनंति.

आपापल्या विभागांमध्ये जे हितगुज सदस्य आहेत त्यांच्याशिवाय अन्य मराठे परिवारीयांची माहिती आपण आमच्यापर्यंत पोहोचविल्यास आम्ही त्यांच्याशी संपर्क साधून त्यांनी सदस्य होण्यासाठी प्रयत्न करू. कारण प्रत्येक वेगळ्या राहणाऱ्या स्वतंत्र कुटुंब घटकाचा माठे परिवाराशी थेट संबंध स्थापित होण्याच्या दृष्टीने अशा सर्व सदस्यांनी हितगुजचे तहह्यात वर्गणीदार असणे आवश्यक आहे.

## हितगुज निधि :

अहवाल साली या निधीमध्ये देणग्या रु.१,४०१ तहह्यात वर्गणी रु.९,३०० व्याज रु. २२,४७६ मिळून रु.३३,१७७ ची वाढ झाली व निव्वळ हितगुज प्रकाशन खर्च रु.४९,३५७ वजा जाता रु.२,८३,५०५ सालअखेर शिल्लक आहेत. (गतसाली रु.२,९९,६८५).

हितगुज हे प्रतिष्ठानचे मुखपत्र आहे. त्याहून ही ते सशक्त संपर्कमाध्यम व्हावे हा आपला प्रयत्न आहे. जास्तीत जास्त सदस्यांपर्यंत पोहोचण्याचा उद्देश समोर ठेऊन वर्गणी न वाढवता देणग्या, जाहिराती व अधिकाधिक तहह्यात वर्गणीदार बनवून हितगुज निधीमध्ये भरघोस वाढ होऊ शकली तरच निधीवरील व्याज आणि हितगुज छपाई व वितरण खर्चाची तोंड मिळवणी होऊ शकेल. यासाठी आम्ही आपल्या जाहिरातींच्या आधाराची अपेक्षा करत आहोत.

## अ. कै. विनय खांबेटे स्मृति योजना :

या योजनेतून इंजिनियरिंगच्या उच्च शिक्षणासाठी बिनव्याजी कर्ज लिं जाते. व्याज रु.४३५८ जमा होऊन अहवालसाल अखेर रु.६२,४६० उपलब्ध आहेत. (गतवर्षी रु.५८,१०२). त्यामुळे कर्जासाठी विचार करता येईल.

## कै. अनिता खांबेटे स्मृती पारितोषिक योजना :

श्री.सी.गो. खांबेटे (पृ.६७६) यांनी प्रायोजित केलेल्या या योजनेतून प्रतिवर्षी दहावी, बारावी आणि चौथीची व सातवीची शिष्यवृत्ती या ४ परीक्षांतून मराठे परिवारामध्ये सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस प्रत्येकी रु.२५०चे पारितोषिक दिले जाते. अखेर अहवालसाली व्याज रु.९७८ मिळून व पारितोषिके रु.७५० वजा जाता वर्षअखेर रु.१३,२६३ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.१३,०३५).

## गणेश तांत्रिक शिक्षण पारितोषिक योजना:

श्री. प्रभाकर गणेश (पृ.६१) यांनी प्रायोजित केलेल्या या योजनेतून दहावी/बारावीला तांत्रिक विषय घेऊन पुढे शिक्षण चालू ठेवणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिके दिले जाते. पात्रतेचे निकष हितगुज जून २००५ मध्ये पहा. या योजनेमध्ये अहवालसाली रु.१,४६८ व्याज मिळून व पारितोषिकाचे रु.५०० वजा जाता रु.२०,५३७ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.१९,५६९).

## हिंदी पारितोषिक योजना :

सौ. सुलभा अनंत (पृ.३२६) प्रायोजित या योजनेतून दहावीच्या परीक्षेत हिंदी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांस रु.१००चे पारितोषिक दिले जाते. अहवालसाली व्याज रु.१०१ मिळून वर्षअखेर रु.१,३४९ शिल्लक आहेत. (१००रु. पारितोषिक वजा जाता गतवर्षी रु.१,३४८).

## पुणे वास्तु प्रकल्प ठेव योजना

पुणे शाखेने या वर्षी 'इमारत निधी' अुभारून रु.---------- मिळाले.

(रु.२८,३५१ इतका जमला आहे.)

## वैदिक शिक्षण योजना :

श्रीमती शालिनी धुंडिराज (पृ.१३४) प्रायोजित योजनेनुसार वैदिक शिक्षण किंवा हिंदू धर्मप्रचारासाठी प्रतिवर्ष रु.१००० पर्यंत रोख पुरस्कार दिला जातो. अहवाल वर्षी व्याज रु.१,२०८ ची भर पडून रु.१७,३१४ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.१६,१०६)

## शौर्य पारितोषिक योजना :

श्री. वामन गणेश (पृ.५०३) प्रायोजित या योजनेत अहवालसाली व्याज रु. २०३ मिळून वर्षअखेर रु.२,९१३ शिल्लक आहेत. (गतवर्षी रु.२,७१०)

## शाखा-कार्य पुणे शाखा :

पुणे वास्तु प्रकल्प शाखेने यावर्षी 'इमारत निधी' अुभारला त्यासाठी देणग्या रु......आले त्यासाठी गाण्याचा कार्यक्रम केला होता त्यातून रु......... मिळाले.

## पुणे दैनंदिनी निधी :

अहवालसाली पुणे शाखेने प्रसिद्ध केलेल्या दैनंदिनी २००८ च्या माध्यमातून पृष्ठदान रुपाने रु.२२,२०० व गतवर्षीच्या निधीवर व्याज रु. ४,२१२ मिळून एकूण प्राप्त झाले ते सर्व दैनंदिनी निधीमध्ये वर्ग केले आहेत. अशा प्रकारे अहवालसालअखेर या निधीमध्ये रु.८२,५६७ जमा आहेत. याशिवाय दैनंदिनीकरिता आलेल्या जाहिराती रु.२९,५५० व विक्री रु.४,५०० मिळून रु.३४,०५० प्राप्त झाले. छपाई व वितरणखर्च रु.४०,४२१ झाला.

याखेरीज सांगली मिरज, नागपूर, गोवा व पुणे येथील बांधव छोटेछोटे मेळावे घेऊन विचार विनिमय करतात. लहानसहान कार्यक्रम करतात. अन्यत्र सुद्ध असे कार्यक्रम, मेळावे झाले पाहिजेत. सदस्यांचे पत्ते हितगुजमध्ये छापावयास सुरुवात केल्यापासून परस्पर संपर्क साधून अशा प्रकारचे नियोजन स्थानिक पातळीवर करणे आता सोपे झाले आहे. बेळगांव, बंगलोर, बडोदे, अहमदाबाद, भोपाळ, ग्वाल्हेर, इंदूर, हैद्राबाद इ. परप्रांतीय ठिकाणी देखील असे प्रयत्न अवश्य करावे. आम्हाला पूर्वसूचना मिळाल्यास प्रतिष्ठानचे प्रतिनिधी समक्ष उपस्थित राहून मार्गदर्शन करण्यास उत्सुक आहेत.

## श्रद्धांजली :

अहवालसाली ज्या व्यक्तिंचे दुःखद निधन झाले त्यांची नावे हितगुजच्या अंकामधून वेळोवेळी प्रसिद्ध केली जातात. या सर्व ज्ञात व अज्ञात मृत व्यक्तींच्या परिवार-सदस्यांच्या दुःखामध्ये प्रतिष्ठान सहभागी आहे.

## ऋणनिर्देश :

प्रतिष्ठानच्या कार्यात ज्या सभासदांनी व त्यांच्या कुटुंबियांनी वेळात वेळ काढून सर्व कामे बाजूला सारून, प्रसंगी कौटुंबिक दुःख विसरून प्रत्यक्ष अप्रत्यक्ष हातभार लावला, तसेच ज्या सभासदानी प्रतिष्ठानच्या विविध उपसमित्यांवर निरपेक्षपणे काम केले त्या सर्वांचे कार्यकारी मंडळ अत्यंत ऋणी आहे. याशिवाय प्रतिष्ठानच्या विविध निधी व योजनांसाठी आपला आर्थिक सहभाग देऊन आमच्या अंगीकृत उपक्रमांना भरीव सहाय्य करणाऱ्या असंख्य परिवार सदस्य व जाहिरातदारांचे मनःपूर्वक आभारी आहोत.

**श्री.आनंद यशवंत मराठे**

**अध्यक्ष**

❑❑❑

# THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

## SCHEDULE VIII

**[VIDE RULE 17 (1)]** **REG.NO. E - 7918 (BOM)**

**NAME OF THE PUBLIC TRUST MARATHE PRATISHTHAN**

**BALANCE SHEET AS AT.......31ST MARCH, 2008**

| FUNDS AND LIABILITIES | RS. | RS. |
|---|---|---|
| **KAYAM NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 177,795.00 | |
| ADD: LIFE MEMBERSHIP (MU) | 1,300.00 | |
| ADD: LIFE MEMBERSHIP (PU) | 2,000.00 | |
| ADD: HITCHINTAK (MU) | 500.00 | |
| ADD: ASHRAYDATA (MU) | 1,00.00 | 182,595.00 |
| **KULVRUTTANT NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 7,633.00 | |
| ADD: DONATION | 3,002.00 | |
| ADD: INTEREST | 572.00 | 11,207.00 |
| **SHIKSHAN NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 391,279.00 | |
| ADD: DONATIONS (MU) | 21,000.00 | |
| ADD: DONATIONS (PU) | 10,000.00 | |
| ADD: INTEREST | 29,346.00 | |
| LESS : TRANSFER TO I & E A/C | (6,100.00) | 445,525.00 |
| **SURESHBHAU SMRUTI NIDHI** | | |
| BANALCE AS PER LAST BALANCE SHEET | 75,706.00 | |
| ADD: INTEREST | 5,678.00 | 81,384.00 |
| **UDYOG PRAVARTAN NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 47,009.00 | |
| ADD: INTEREST | 3,526.00 | 50,535.00 |
| **VISHISHTA HETU NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 134,602.00 | |
| ADD: INTEREST | 10,095.00 | 144,697.00 |
| **VAIDYAKIYA NADAT NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 29,096.00 | |
| ADD: DONATIONS (MU) | - | |
| ADD: DONATIONS (PU) | 5,500.00 | |
| ADD: INTEREST | 2,182.00 | |
| LSS: TRANSFER TO I & E A/C | (10,000.00) | 26,778.00 |
| **HITGUJ NIDHI** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 299,685.00 | |
| ADD: DONATIONS (MU) | 1,401.00 | |
| ADD: SUBSCRIPTION (MU) | 5,700.00 | |
| ADD: SUBSCRIPTION (PU) | 3,600.00 | |
| ADD: INTEREST | 22,476.00 | |
| LESS: TRANSFER TO I & E A/C | (49,357.00) | 283,505.00 |
| **VINAY KHAMBETE SMRUTI YOJANA** | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 58,102.00 | |
| ADD: INTEREST | 4,358.00 | |
| LESS: TRANSFER TO I & E A/C | - | 62,460.00 |
| **ANITA KHAMBETE SMRUTI YOJANA** | | |
| BANALCE AS PER LAST BALANCE SHEET | 13,035.00 | |
| ADD: INTEREST | 978.00 | |
| LESS: TRANSFER TO I & E A/C | (750.00) | 13,263.00 |
| **TOTAL C/F** | | **13,01,949.00** |

| PROPERTY AND ASSETS | RS.RS. | |
|---|---|---|
| **INVESTMENTS** | | |
| FIXED DEPOSITS WITH | | |
| SARASWAT CO-OP. BANK, WORLI, | 428,144.00 | |
| COSMOS CO-OP. BANK, DADAR | 165,000.00 | |
| JANATA SAHAKARI BANK, DADAR | 182,542.00 | |
| JAN KLYAN SAH. BANK, DADAR | 75,000.00 | |
| JAN KALYAN SAH. BANK, SHIVAJI PARK | 110,000.00 | |
| JAN KALYAN SAH. BANK, SION | 258,479.30 | |
| UCOBANK PUNE | 160,793.00 | |
| U.T.I. - C.R.T.S. | 59,000.00 | 1,438,958.30 |
| **INTEREST RECEIVABLE** | | |
| ON FIXED DEPOSITS WITH | | |
| JANAKALYAN SAH. BANK LTD, SION | 21,546.00 | |
| UCO BANK, PUNE | 18,916.00 | 40,462.00 |
| T.D.S. RECEIVABLE | | |
| FOR 1998-1999 | 2,262.00 | |
| FOR 1999-2000 | 4,968.00 | |
| FOR 2000-2001 | 2,188.00 | |
| FOR 2001-2002 | 2,296.00 | |
| FOR 2002-2003 | 2,002.00 | |
| FOR 2003-2004 | 696.00 | 14,412.00 |
| **CASH AND BANK BALANCES** | | |
| CASH ON HAND WITH | | |
| MUMBAI OFFICE | 806.00 | |
| PUNE BRANCH | 11,561.50 | 12,367.50 |
| **CASH AT BANK WITH** | | |
| SARASWAT BANK LTD. | 192,711.35 | |
| UCO BANK | 68,551.58 | 261,262.93 |
| LOAN TO RAVINDRA R. KHAMBETE | | 10,000.00 |
| **TOTAL C/F** | | **17,77,462.73** |

# THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

## SCHEDULE VIII

**[VIDE RULE 17 (1)]** **REG.NO. E - 7918 (BOM)**

**NAME OF THE PUBLIC TRUST MARATHE PRATISHTHAN**

**BALANCE SHEET AS AT.......31ST MARCH, 2008**

| FUNDS AND LIABILITIES | RS. | RS. | PROPERTY AND ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **TOTAL B/F** | | **13,01,949.00** | **TOTAL B/F** | | **17,77,462.73** |
| **GANESH TANTRIC SHIKSHAN YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 19,569.00 | | | | |
| ADD: INTEREST | 1,468.00 | | | | |
| LESS: TRANSFER TO I & E A/C | (500.00) | 20,537.00 | | | |
| **HINDI PATOSHIK YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 1,348.00 | | | | |
| ADD: INTEREST | 101.00 | | | | |
| LESS: TRNSFER TO I & E A/C | (100.00) | 1,349.00 | | | |
| **YUVA MANCH NIDHI** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 1,244.00 | | | | |
| ADD: INTEREST | 93.00 | 1,337.00 | | | |
| **VAIDIK SHIKSHAN YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 16,106.00 | | | | |
| ADD: INTEREST | 1,208.00 | 17,314.00 | | | |
| **SHOURYA PARITOSHIK YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 2,710.00 | | | | |
| ADD: INTEREST | 203.00 | 2,913.00 | | | |
| **PUNE DAINANDINI YOJANA** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 56,155.00 | | | | |
| ADD: DONATIONS (PU) | 22,200.00 | | | | |
| ADD: INTEREST | 4,212.00 | 82,567.00 | | | |
| **VASTU PRAKALPA THEV** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 85,000.00 | | | | |
| ADD: ADDITION DURING THE YEAR | - | 85,000.00 | | | |
| **BUILDING FUND (PUNE)** | | | | | |
| RECEIVED DURING THE YEAR | | 28,351.00 | | | |
| **CURRENT LIABILITIES & PROVISIONS** | | | | | |
| AUDIT FEES | 750.00 | | | | |
| CONTRIBUTION TO CHARITY COMM. | 6,180.00 | 6,930.00 | | | |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | | | | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | 215,354.65 | | | | |
| ADD: SURPLUS BEING EXCESS OF INCOME OVER EXPENDITURE | 13,861.08 | 229,215.73 | | | |
| **TOTAL** | | **1,777,462.73** | **TOTAL** | | **1,777,462.73** |

NOTE: THE HEADINGS AS PER THE PRESCRIBED FORM WHICH ARE ABSENT IN THE ABOVE STATEMENT SHOULD BE READ AS 'NIL'

THE ABOVE BALANCE SHEET TO THE BEST OF MY BELIEF CONTAINS A TRUE ACCOUNT OF THE FUNDS AND LIABILITIES AND OF THE PROPERTY AND ASSETS OF THE TRUST

SUBJECT TO OUR REPORT OF EVEN DATE

**FOR CHANDRAKANT WAMAN MARATHE**

sd/-
CHARTERED ACCOUNTANTS
MEMBERSHIP NO.31107

MUMBAI: DATED NOVEMBERR 03,2008

**FOR MARATHE PRATISHTHAN**

| sd/- | sd/- | sd/- |
|---|---|---|
| **PRESIDENT** | **SECRETARY** | **TRESEAURE** |

# THE BOMBAY PUBLIC TRUST ACT, 1950

## SCHEDULE VIII

**[VIDE RULE 17 (1)]** **REG.NO. E - 7918 (BOM)**

**NAME OF THE PUBLIC TRUST MARATHE PRATISHTHAN**

**INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED : 31ST MARCH 2008**

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| AUDIT FEES | | 750.00 | BY INTEREST ON FIXED DEPOSITS | | 7,523.58 |
| | | | BY INTEREST ON SAVING BANK ACCOUNT | | |
| TO EXPENDITURE WRITTEN OFF ON THE OBJECT OF TRUST | | | WITH SARASWAT CO-OP. BANK | 14,279.00 | |
| MUMBAI MUKHYA KARYALAYA EXPENSES | | | WITH UCO BANK PUNE | 649.00 | 14,928.00 |
| ANNUAL MEETING EXPENSES | 1,460.00 | | | | |
| POSTAGE & DISTRIBUTION (MU) | 103.00 | | BY TRANSFER FROM VARIOUS NIDHI & YOJANA | | |
| ANITA KHAMBETE SMRUTI PRIZES | 750.00 | | SHIKSHAN NIDH (R) | 6,100.00 | |
| MERIT & PRIZES | 6,100.00 | | ANITA KHAMBETE SMRUTI YOJANA (R) | 750.00 | |
| GANESH TANTRIC SHIKSHAN PRIZES | 500.00 | | GANESH TANTRIC SHIKSHAN YOJANA (R) | 500.00 | |
| HINDI PARITOSHIK | 100.00 | | HINDI PARITOSHIK YOJANA (R) | 100.00 | |
| | | | VAIDYAKIYA NIDHI (R) | 10,000.00 | 17,450.00 |
| KULVRUTTANT XEROX EXPENSES | 10,000.00 | | BY MISCELLANEOUS INCOME | | |
| MISCELANEOUS EXPENSES | 1,745.00 | 20,758.00 | SALE OF KULVRUTTANT | 1,200.00 | |
| | | | T.D. REFUNDED | 1,332.00 | 2,532.00 |
| PUNE BRANCH EXPENSES | | | | | |
| PRINTING & STATIONERY (PU) | 981.00 | | BY PUNE BRANCH INCOME | | |
| BANK CHARGES (PU) | 145.00 | | ANNUAL DAY DONATION | 555.00 | |
| POSTAGE & DISTRIBUTION (PU) | 182.00 | 1,308.00 | VADHU VAR ACTIVITY (PU) | 60.00 | 615.00 |
| | | | BY PUNE DAINANDINI INCOME | | |
| | | | ADVERTISEMENTS | 29,550.00 | |
| PUNE DAINANDIN EXPENSES | | | SALE OF DAINANDIN | 4,500.00 | 34,050.00 |
| PRINTING, DISTRIBUTION ETC | | 40,421.50 | | | |
| | | | BY HITGUJ PRAKASHAN INCOME | | |
| BY HITGUJ PRAKASHAN EXPENSES | | | ADVERTISEMENTS | 2,800.00 | |
| HITGUJ PRINTING (MU) | 44,062.00 | | TRNSFER FROM HITGUJ NIDHI | 49,357.00 | 52.157.00 |
| HITGUJ POSTAGE (MU) | 7,220.00 | | | | |
| HITGUJ POSTAGE (PU) | 875.00 | 52,157.00 | | | |
| INCOME & EXPENDITURE ACCOUNT | | | | | |
| SURPLUS BEING EXCESS OF INCOME | | 13,861.08 | | | |
| OVER EXPENDITURE C/F TO BALANCE SHEET | | | | | |
| | **TOTAL** | **129,255.58** | | **TOTAL** | **129,255.58** |

NOTE: THE HEADINGS AS PER THE PRESCRIBED FORM WHICH ARE ABSENT IN THE ABOVE STATEMENT SHOULD BE READ AS 'NIL'

SUBJECT TO OUR REPORT OF EVEN DATE

**FOR CHANDRAKANT WAMAN MARATHE**

**FOR MARATHE PRATISHTHAN**

| sd/- | sd/- | sd/- |
|---|---|---|
| **PRESIDENT** | **SECRETARY** | **TRESEAURE** |

sd/-
CHARTERED ACCOUNTANTS
MEMBERSHIP NO.31107

MUMBAI: DATED NOVEMBERR 03,2008

## प्रतिष्ठान वृत्त
## कार्यकारी मंडळ

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शुक्रवारी ४ वाजता. कार्यकारी मंडळाची सभा होते. सभेच्या दिवशी कोणीही सभासद कार्यकारी मंडळाला भेटण्यासाठी येऊ शकतो. (मात्र येण्यापूर्वी कार्यवाहांशी दूरध्वनीवर संपर्क करून यावे म्हणजे सभेची जागा व दिवस यात बदल असल्यास समजेल व गैरसोय टळेल.)

शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २००८ला दुपारी ४ वाजता उपाध्यक्ष श्री. रमाकांत विद्वांस यांच्या निवासस्थानी प्रतिष्ठानची बैठक भरली. कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या संख्येने जमले होते. कार्यवाहांनी अहवालवाचन केले. प्रतिष्ठानकडे आलेल्या पत्रव्यवहाराबाबत चर्चा झाली. परंतु बैठकीत मुख्य विषय हितगुजच्या ७५व्या अंकाच्या प्रकाशन कार्यक्रम हा होता. तो कशा प्रकारे उत्तमरित्या साजरा करा यविषयी चर्चा होऊन कार्यक्रमाची निश्चित रुपरेषा ठरविण्यात आली. चहापानानंतर बैठक संपली.

शुक्रवार दि. १७ ऑक्टोबर २००८ ला दुपारी ४ वाजता. मराठे प्रतिष्ठानचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. अरविंदराव दामोदर मराठे, डोंबिवली यांच्या 'सदय' या बंगल्यावर कार्यकारिणीची सभा भरली होती. 'हितगुज' विषयी चर्चा, त्याचे वितरण अधिक चांगल्या रीतीने कसे करता येईल याविषयी विचारविनिमय झाला. दि. २७ सप्टेंबरच्या हितगुज प्रकाशन कार्यक्रमाविषयीच्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या. काही महत्त्वाच्या सूचना केल्या गेल्या. पत्रव्यवहाराचे वाचन झाले.

शुक्रवार दि. १४ नोव्हेंबर २००८ ला कार्यकारी मंडळाची बैठक मराठे उद्योग भवन, प्रभादेवी येथे भरली होती. मोठ्या संख्येने कार्यकारिणी सदस्य जमले होते. या बैठकीला विश्वस्त श्रीमती सुलभाताई मराठे तसेच त्यांचे चिरंजीव श्री. यशवंत सुरेश खारचे श्री. सदानंद विष्णू भाऊ मराठे उपस्थित होते. गोव्याच्या सौ. अपूर्वा मराठे याही उपस्थित होत्या. (त्या पीएचडी च्या संशोधनासाठी टाटा इंस्टिट्यूट मुंबई येथे आल्या होत्या. तेव्हा अभ्यासातून वेळ काढून मराठे परिवाराला भेटण्यासाठी आवर्जून आल्या हे विशेष.) त्यांनी सांगितले की गोव्याला तुम्ही अवश्य या, दसरा-दिवाळीला या नाहीतर शिमगा, देवदेवतांचे उत्सव, पालखीसोहळा यासारखे सण-समारंभ गोव्यात सारखे सुरू असतात. कार्यकारिणीची सहल आणलीत तरी चालेल. संमेलन मात्र नको. कारण मनुष्यबळ नाही. गैरसोय होऊ शकते. वस्तूंचा अपुरेपणा पडतो; असे त्यांनी सांगितले.

या बैठकीत विशेष महत्त्वाची गोष्ट म्हणजे कोषाध्यक्ष श्री. प्रभाकर मराठे, चार्टर्ड अकौंटंट यांनी २६वा वार्षिक अहवाल व हिशेबपत्रके १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ आय-व्यय, ताळेबंद सभेपुढे सादर केले अेकमताने ते मंजूर झाले (याच अंकात पृ.१४ ते १६ वर पाहा.)

या बैठकीत 'हितगुज' भाऊ मराठे यांच्याकडे उर्वरित मान्यवरांच्या मुलाखती कंपोज करण्यासाठी त्वरित आणून द्याव्यात म्हणजे डिसेंबरच्या अंकात त्या प्रकाशित होतील असे डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर यांनी सांगितले. भाऊंनी ते मान्य केले. पत्रव्यवहाराचे वाचन झाले. वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ डिसेंबरला सायंकाळी ५ वा. दामले-योग केंद्र माहीम या ठिकाणी घेण्याचे सर्वानुमते ठरले.

❑❑❑

### मराठे प्रतिष्ठान

सार्वजनिक विश्वस्त नोंदणी क्र.७९१८ (मुं.) दि.१२.१.८१
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०००२५.)

**ई-मेल :** maratheparivar@yahoo.co.in

**वेबसाईट :** www.marthepratishthan.org

आजीव सभासद व हितगुज तहहयात वर्गणीदार होण्यासाठी करावयाचा अर्ज

**(नमुना)**

मराठे प्रतिष्ठानची घटना व नियमांनुसार मी मराठे प्रतिष्ठानचा आजीव सदस्य व हितगुज या त्रैमासिक मुखपत्रासाठी तहहयात सदस्य होऊ इच्छित आहे.

आजीव सदस्य वर्गणी रु.१०० व हितगुजची तहहयात वर्गणी रु. २०० मिळून एकूण रु.३०० सोबत रोख / मनीऑर्डरने / मुंबईतील बँकेवर काढलेल्या डिमांड ड्राफ्टने / चेकने पाठवीत आहे.

ड्राफ्ट/चेक क्रमांक दिनांक
बँकेचे व शाखेचे नाव:
सही
संपूर्ण नांव:
जन्मतारीख
पत्ता:
पिनकोड
टेलिफोन/सेल
ई-मेल:
व्यवसाय/नोकरी पूर्ण तपशीलासह
कार्यालयीन पत्ता :
कार्यालयीन टेलिफोन व इ-मेल

*(वि.सू.- विवाहित सासुरवाशिणींनी पतीचे संपूर्ण नाव व पत्ता, तसेच माहेरवाशिणींनी पित्याचे संपूर्ण नाव व पत्ता कळवावा.)*


**पणजी सौ. यशोदा प्रभाकर मराठे**

यांच्या स्मरणार्थ

**CA प्रभाकर दामोदर मराठे**

वडाळा, मुंबई ४०००३१

सेल:९८२० २३२०८२ दूरध्वनी : २४१५ ०८८९

ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com

# 'हितगुज'च्या अमृतमहोत्सवी पंच्याहत्तराव्या अंकाचे दिमाखात प्रकाशन

**विख्यात साहित्यिक नाटककार माननीय श्री. सुरेश खरे यांच्या शुभहस्ते**

शनिवार दि. २७ सप्टेंबर २००८ ला दुपारी ४ वाजता ठाणे येथील लक्ष्मीकेशव कार्यालयात 'हितगुजच्या' अमृतमहोत्सवी अंकाचा प्रकाशन सोहळा मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाला सुरुवात झाली. मराठे प्रतिष्ठानचे कार्यवाह श्री. मोहनराव मराठे यांनी प्रास्ताविक करून अुपस्थितांचे स्वागत केले आणि विख्यात साहित्यिक, नाटककार श्री. सुरेश खरे यांच्या शुभहस्ते 'हितगुज'चे टाळ्यांच्या कडकडाटात दिमाखात प्रकाशन झाले. 'हितगुज'चे भूतपूर्व संपादक श्री. लक्ष्मणराव शंकर मराठे यांनी 'हितगुज' विषयी माहिती सांगितली. त्यानंतर डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (सध्याच्या संपादिका) यांनी आपले मनोगत थोडक्यात मांडले. सहसंपादक श्री. सी.गो. खांबेटे यांनी हितगुजचे संगणकीकरण आणि कुलवृत्तांताविषयी बहूमोल माहिती सांगितली. प्रमुख पाहुणे श्री. सुरेश खरे यांचा डॉ. सौ. सुमेधा प्रभाक यांनी परिचय करून दिला.

'हितगुज'च्या ७५व्या अंकात ज्या मान्यवरांच्या मुलाखती घेतल्या होत्या त्यांचा सुंदर गुलाबपुष्प देऊन माननीय सुरेश खरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. (अुत्तम सुत्रसंचालन केल्याबद्दल श्री अनंत मराठे यांचा सत्कार करण्यात आला.) जलतरणपटू श्री. दत्तत्रेय मराठे, ज्ञानतपस्विनी सौ. शुभा रमाकांत विद्वांस, तबलावादक श्री. शेखर खांबेटे, रत्नपारखी सौ. सुप्रिया मंदार मराठे, लेखिका - संपादिका सौ. आश्विनी मयेकर, आरोग्यदिंडी पंढरीस नेणारे श्री. अभय मराठे, डॉ. सीमा शाम मराठे, डॉ. वसुधा आपटे 'हितगुज'च्या मुखपृष्ठावर झळकणारी प्रिया मराठे इत्यादी सत्कारमूर्ती अुपस्थित होत्या.

सत्कारानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे माननीय श्री. सुरेश खरे यांचे प्रभावशाली भाषण झले.




**'हितगुज'चे प्रकाशन करताना सुरेश खरे, उजव्या बाजूला संपादिका आणि सूत्रसंचालक अनंतराव मराठे, डाव्याबाजूला उपाध्यक्ष श्री.रामाकांत विद्वांस व अध्यक्ष श्री. आनंदराव मराठे**

## गायनाचा कार्यक्रम

'हितगुज'च्या ७५व्या अंकाचे प्रकाशन झाले त्याप्रित्यर्थ संध्या खांबेटे आणि निषाद पाटील यांचा सुस्वर व सुरेल असा गायनाचा कार्यक्रम झाला. संध्या खांबेटे यांनी 'उगवला चंद्र पुनवेचा', 'जीवलगा राहिले रे दूर घर माझे', 'आज जाने की जिद् ना करो', 'लग जा गले' तर श्री. निषाद पाटील यांनी 'पिया तोसे', 'कजरा मोहब्बतवाला', 'ॐकार स्वरूपा', 'कही दूर जब दिन ढल जाए', 'मधुबनमे राधिका नाचे' अशी अेकाहून अेक सरस गाणी सादर करून श्रोत्यांची वाहव्वा मिळवली. 'अवघा रंग अेकची झाला' या संध्या खांबेटे यांनी गायिलेल्या भैरवीने कार्यक्रमाची सांगता झाली. स्वादिष्ट अल्पोपहार आणि सीताफळाच्या आईस्क्रीमचा गार थंडावा काही औरच !

❑❑❑

**वाचकांचा पत्रव्यवहार**

संपादिका, हितगुज,
डॉ. सौ. सुमेधाताई,


माझे वडिल श्री. वि.म. मराठे विप्रामबाग, सांगली यांच्याकडून आपला सप्टेंबर २००८चा हितगुज अंक मिळाला व हातात पडताक्षणी संपूर्ण वाचून काढला आणि मी थक्क झाले. एवढा सर्वांग परिपूर्ण, अनेकांच्या उत्कृष्ट व प्रोत्साहन देणाऱ्या मुलाखती, अंकाचे पूर्ण सर्वांगसुंदर रुप बघून खूप आनंद झाला. श्री. लक्ष्मण शंकर यांची हितगुजच्या वाटचालीसाठी केलेली खटपट व श्रम बघूनही माणसे कुठे कुठे कसे श्रम, वेळ, पैसा घालून धडपडत असतात. याचाही प्रत्यय आला. असा उत्कृष्ट अंक दिल्याबद्दल अनेक वेळा धन्यवाद.

मी गेली १४ वर्षे लहान मुलांचे रेडीमेड कपडे बनवते. आपल्याला मराठे परिवारातील कुणाला त्यासंबधी मार्गदर्शन हवे असले तर मी प्रात्याक्षीकासह देईन (विनामूल्य) व तसेच मी व माझ्या पतींनी संपूर्ण भारतभर व श्री. कैलास मानस यात्रा केली आहे त्या सर्वांची वर्णन संग्रह आहे. तुम्हाला जर योग्य वाटले तर हितगुजमध्ये प्रसिद्ध करा.

***सौ. गायत्री गोविंद लेले***
लेलेवाडा, दिंडी वेस,
ब्राम्हणापुरी, मिरज-४१५४१०
फोन-(०२३३ २२२३५६३)

## मानसन्मान

**'जलतरण'स्पर्धेत श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे विजयी**



**दत्तात्रेय आत्माराम मराठे**

दि. २०-२१ ऑक्टोबर २००७ ला इंदुर येथे पाचवी जलतरण स्पर्धा आयोजित केली होती. त्यात ८० वर्षावरील गटात दोन इव्हेंटमधे म्हणजे ५० मीटर फ्रीस्टाईल आणि ५० मीटर बॅक स्ट्रोकस् या स्पर्धेत श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे, मुलुंड वय वर्ष ८४ यांना दोन्ही गटात गोल्ड मेडल मिळाले. आणि ते जलतरण स्पर्धेतील विजयी मानकरी ठरले. मराठे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन.

योगायोग असा चांगला की या जलतरण विजयीवीरांचा सत्कार विख्यात नाटककार सुरेश खरे यांच्या हस्ते दि. २७ सप्टेंबरला हितगुजच्या ७५व्या अंकाच्या प्रकाशन समारंभात करण्यात आला. सुरेश खरे यांनी या तरुण जलतरणपटूचे विषयी गौरवाद्गार काढताच टाळ्यांचा कडकडाट झाला आणि अुस्फुर्तपणे प्रमुख पाहुण्यांसह सर्व अुपस्थित कुलबांधव-कुलभगिनी यांनी अुभे राहून जलतरणपटू विजयीवीर श्री. दत्तात्रेय आत्माराम मराठे यांना मानवंदना दिली. त्यांनी या शुभप्रसंगी मराठे प्रतिष्ठानला २०० रु. देणगी म्हणून दिले, धन्यवाद.

******

## जिल्हा सत्र न्यायधिश

श्री.रविंद्र मधुसुदन जोशी यांची १६ जून २००८ पासून पुणे येथे जिल्हा व सत्र न्यायधिश म्हणून नियुक्ती झाली आहे. कै.मधुसुदन गोपाळ जोशी यांचे ते चिरंजीव. श्री.रविंद्र दहा बारा वर्ष हायकोर्टात वकीली करीत होते. मुंबई येथे निवड झालेल्या वकीलांमध्ये जिल्हा सत्र न्यायधिश म्हणून ते एकमेव निवडले गेले. ते एलुएलु. एम. झाले तेव्हा मराठे प्रतिष्ठानने त्यांचा सत्कार केला होता. **मराठे प्रतिष्ठान तर्फे त्यांचे अभिनंदन.**

## मानसन्मान

### कार्यकारी अभियंता
### श्री.वि.म. मराठे (पृ.२३५) यांचा सत्कार

सांगलीचे मराठे परिवाराचे ज्येष्ठ सदस्य निवृत्त कार्यकारी अभियंता श्री.वि.म. मराठे यांनी १९५७ साली अहमदनगर जिल्ह्यातील मुळा धरणाचे बांधकाम करण्याचे काम पाहिले आणि त्यांच्या काम करण्याच्या कौशल्यपूर्ण पद्धतीने आणि मार्गदर्शनाने मजबूत, पक्के आणि सुरक्षित असे धरण बांधले गेले. या वर्षी या धरणाच्या कामाला ५० वर्षे झाली म्हणून तेथे सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला.

त्यावेळी सर्व जुन्या अभियंतांना बोलावले होते. श्री.वि.म. ही आवर्जून अुपस्थित राहिले होते. त्यावेळी त्यांचा सत्कार करण्यात आला. या समारंभात वि.म.च्या दोन्ही कन्या अुपस्थित होत्या. कुशल अभियंता श्री.वि.म. मराठे यांचे मराठे प्रतिष्ठान तर्फे हार्दिक अभिनंदन आणि अभिष्ट चिंतन.

## मानसन्मान



**चि.अमेय अनंत मराठे**, ठाणे - अमेरिकेतील ओकाहोमा (नॉरमन), येथील विद्यापीठात एम.बी.ए. परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला. चि. अमेय हा मुंबईतून बी.ई. (कॉम्प्युटर) झालेला आहे. त्याचे सर्व शिक्षण शिष्यवृत्ती मिळवून झाले आहे. पदवीदान समारंभाच्या प्रसंगी, त्याने हातात भारताचा तिरंगा फडकवून आपली देशभक्ती प्रकट केली. या सुयशाबद्दल मराठे प्रतिष्ठान तर्फे चि.अमेयचे हार्दिक अभिनंदन.

# सत्यनारायण कथेचा भावार्थ

**लेखक : श्री.महेश अनंत मराठे**

नैमित्तिक पूजा सांगणाऱ्या गुरुजींची रोडावत चाललेली संख्या लक्षात घेऊन सुमारे वीस पंचवीस वर्षांपूर्वीपासून ब्राह्मण असल्याचा अभिमान (वृथा?) बाळगून कमी तेथे आम्ही या तत्त्वानुसार सत्यनारायण/ गणपती पूजा तसेच अभिषेक करतो आहे. पूजा सांगताना आत्मिक समाधाना बरोबरचं वेगवेगळ्या तऱ्हेचे अनुभव घेत आहे.

श्री सत्यनारायण कथेसबंधित मला आलेला अनुभव आपल्या कुलबांधवांना सांगावासा वाटतो.

दिनांक ९.१०.२००८ रोजी दसऱ्याच्या मुहूर्तावर माझ्या नातेवाईकांकडे पुण्याला श्री सत्यनारायण पूजा त्यांच्या आग्रहाखातर प्रेमामुळे सांगितली. जेव्हा कथा सांगायची वेळ आली तेव्हा कथा नाही सांगितली तरी चालेल असे यजमानांनी सांगुन कथा माहित आहे अशी पुस्तीही जोडली. विषय संपला. ब्राह्मण भोजन झाले. इंद्रायणीने मुंबईला परत येताना सत्यनारायण कथा न वाचण्याचा विचार मनाला अस्वस्थ करत होता. खरेच कथा माझीसुद्धा पाठ आहे. का? वाचायची पुन्हा तीचं तीचं कथा काय बरे असेल कथेचा अर्थ? कधी एकदा घरी येऊन मन रिकामे करतो असे झाले त्याचं रात्री एका बैठकीत विचार लिहून काढले व काही परिचितांना दाखवले त्यांच्यामते सत्यनारायण कथा वाचण्यापूर्वी हे विचार सांगितले तर यजमान कथेचा भावार्थ लक्षात घेऊन कथा श्रद्धेने ऐकतील.

परिचितांमध्ये आपल्या हितगुजचे पूर्वीचे संपादक श्री. लक्ष्मण शंकर मराठे काका हे एक होत. त्यांच्या सांगण्यावरून आपल्या हितगुज मासिकामध्ये 'सत्यनारायण कथेचा भावार्थ' या शीर्षकान्तर्गत छापण्यासाठी देत आहे.

**श्रीसत्यनारायण** म्हणजे **श्रीविष्णूची** पूजा. विष्णू हा सृष्टीचा पालनकर्ता आहे. विष्णू हे सत्याचे प्रतिक. कोणत्याही देवतेची पूजा करताना कथा श्रद्धेने श्रवण करावी अशी पुस्ती जोडलेली असते. सामान्य माणसाला किंवा कोणालाही उपदेश केलेला आवडत नाही. माणूस हा गोष्टी वेल्हाळ असल्याने कथा म्हणजेच गोष्टी रूपात उपदेश केलेला असतो. उपदेश म्हणजे काही मोठे नसून त्या देवतेचे तत्व समजावलेले असते. कशाकरीता? तर ते तत्व अंशत: का होइन आपल्या जीवनात आचरण्यासाठी. या कथा रुपकात्मक असतात भाकड कथा नसतात. देवतांची पूजा करून मानसिक शक्ती येते आत्मिक बळ वाढायला मदत होते.

आता श्री सत्यनारायणाच्या कथेतील रूपकांचा विचार करू.

पूजा-विचार, प्रसाद-कृती, राजा-सत्ता, बळाचे प्रतिक ब्राह्मण- बुद्धिजीवी माणसाचे प्रतिक, यतीअंतर्मन, नौका-संसार, साधुवाणी/ मोळीविक्या - सामान्य माणसाचे प्रतिक.

पहिल्या अध्यायात सत्यनारायणाची पूजा का? केव्हा? कशी? करावी व प्रसाद कसा करावा? या विषयी सांगितले आहे. सत्यनारायणाची पूजा म्हणजे सद्विचार, प्रसाद म्हणजे कृती :साखर, दूध, शुद्ध तूप, गव्हाचा रवा सव्वा प्रमाणाने एकत्र करून सत्यनारायणाला अर्पण करावा. गव्हाचा रवा न मिळेल तर तांदळाचा घ्यावा याचा अर्थ विचार करून त्याला कृतीची जोड द्या. कृतीची सुरवात कोठून करावी असा प्रश्न पडला असेल तरी स्वस्थ न बसता अडखळत का होईना कृती करायचे पहिले पाऊल उचला म्हणजे मार्ग सापडत जाईल.

दुसऱ्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे दरिद्री ब्राह्मण व मोळीवक्या यांच्या सारखेचं सद्विचारी लोकांकडून चांगल्या विचारांना कृतीची जोड देऊन आपले जीवन सुखी करावे हा भावार्थ लक्षात घ्यावा.

तिसऱ्या अध्यायाचा भावार्थ हा की सद्विचारांकडे कधीही पाठ फिरवू नका नाहीतर साधुवाण्या प्रमाणे नवस पुढे पुढे ढकलल्यावर कसे कष्टमय व दु:खी जीवन झाले तसे सद्विचारांची संगत सोडल्यावर आपले होईल. साधुवाणी भगवंताला म्हणतो माझी नौका वेली व पाने यांनी भरलेली आहे. नंतर यती म्हणतो तुझे बोलणे खरे होवो याचा अर्थ सामान्य माणसाला त्याच्या संसाराबद्दल विचारलेले आवडत नाही विचारले तर संसाराच्या तक्रारी/ कटकटींबद्दल सांगतो. आपण बघतो की आपले जसे विचार असतात तसेच घडते. सामान्य माणसाच्या अंतर्मनात हे विचार रुजतात व त्या विचारांप्रमाणे संसारात सुख किंवा दु:ख मिळते.

चौथ्या अध्यायात कलावती एका ब्राह्मणाच्या घरी गेली तेथे पूजा चाललेली पाहून खूप उशीरा पर्यंत तेथे बसली. म्हणजे आपले मन समविचारी माणसाकडे सहज आकर्षित होते व तेथेच आपण रेंगाळत राहतो. आपले मन सद्विचारांकडे वळविले पाहिजे व या विचारांचे सतत मनन केले पाहिजे हा भावार्थ. कलावतीने पूजा केली. परंतू प्रसाद भक्षण न करता पती दर्शनासाठी उत्सुक झालेली ती तशीच गेली. म्हणजे विचार केला पण या विचारांना कृतीची जोड नसेल तर इप्सित ध्येयापर्यंत पोचू शकत नाही असा या वाक्याचा भावार्थ आहे.

पाचव्या अध्यायात अंगध्वज राजाची गोष्ट आहे. शेवटी सत्यनारायणाच्या पूजेला वेगवेगळ्या नावांनी संबोधत असले तरी कशी फल देणारी आहे हे सांगितले आहे. राजा हे सत्तेचे म्हणजेचं बळ असल्याचे प्रतिक. नुसते बळ असून उपयोग नाही तर बळाचा उपयोग योग्य तऱ्हेने सद्विचारांची जोड देऊन केला पाहिजे हा भावार्थ ध्यानात घ्यावा. प्रत्येक संक्रांत व पौर्णिमा या दिवशी सत्यनारायण करू लागला. यातून हेच सुचवायचे असेल की नेहमी सद्विचारांच्या संगतीत राहिले पाहिजे.

चांगले विचार, सद्विचार, बघण्याचा दृष्टिकोन, चष्मा अशी कोणतीही नावे दिली तरी मूळात सद्विचारांत राहून कृतीची जोड देणे महत्त्वाचे हा सत्यनारायण कथेचा अर्थ लक्षात घेतला तर हा भवसागर सहज पार करण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो.

**श्री.महेश अनंत मराठे,**
घराणे ७२वें गोमांतक,
मुलुंड (पूर्व),
मुंबई-४०००८१
फोन नं.२१६३२९४८

❑❑❑

## वाचकांचा पत्रव्यवहार

माननीय संपादिका,

अशोक मनोहर मराठे आणि माझ्या परिवारातर्फे स्नेहपूर्वक नमस्कार. अभिनंदन ! आपल्या मराठे प्रतिष्ठानचे मुखपत्र ''हितगुज''ने ७५व्या वर्षात पदार्पण झालेले पाहून अतिशय आनंद झाला. लहान मुलासारखा क्षणार्धात 'हितगुज' घेतले.

मुखपत्राच्या, मलपृष्ठावरील अभिनयनिपुण, सुंदर. छायाचित्रासह, प्रत्येक पान उत्कृष्ट, मनाला वाचनीय आणि भावनाशील, अभिमान वाटतो आहे.

७५वा अंक ''हितगुज'' मुखपत्र प्रकाशित करण्यासाठी बांधवांना आणि भगिनींना माझ्या आणि परिवारातर्फे ॥हार्दिक शुभेच्छा॥

**अ.म. मराठे** (पृष्ठ ३९२)<br>श्रीनिवास, तळमजला,<br>वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क,<br>दादर, (प.) मुंबई-४०००२८.<br>दि. ३० सप्टेंबर २००८<br>Email-ashok1945@rediff.com<br>Mobile-9869463372

--------

स.न.

'अमृत महोत्सवी' हितगुज संपूर्ण वाचला. 'माझा परिवार' हा माझा लेख पाहून सुखद धक्का बसला. मला या अंकाबद्दल पूर्ण कल्पना कसलीच नव्हती. योगा योगाने प्रकाशन समारंभाला येता आले. म्हणून अंक मिळाला. मला आजपर्यंत अंक मिळाला नाही.

'हितगुज' तरुण झाला हे आवडले. नवं ते सर्वांना हवं हे सत्यच आहे. नित्य नवं (सनातन) देत रहाण्याची जबाबदारी मोठी आहे. आपण ती पेलाल असा विश्वास वाटतो. तुमचा माझा व्यक्तीगत परिचय नाही. कार्यांतूनच परिचय होतो. तो यापुढे होत राहील. खांबेटे उत्साही आहेत. कम्प्युटर मास्टर आहेत. त्यांनी आपले उत्तम योगदान दिले आहे.

मुलाखतीत केंद्रवर्ती ठेऊन अंक सजवला आहे - तो सग्राह्य झाला आहे.

'वडीलांचे मुलाला पत्र', ओढ - कथा, मला उमगलेले अध्यात्म, विरांगना मॅडम कामा वाचनीय आहे. भाऊ मराठेंच्या मुलाखती भाऊचा धक्काच, मुलाखतीचे तंत्र - उत्तम साधले आहे. पण मुलाखतींचा अतिरेक टाळावा. वैविध्य व नेटकेपणा आणला पाहिजे. फोटो कमी पण मर्मग्राही असावे.

संपूर्ण पान जाहिरात त्यावर फक्त नांव व मोबाईल हा जागेचा अपव्यय आहे. जाहिरात द्यायलाच त्याच्या आवडीचे सांहित्य अर्धे पेज देण्याचे सांगावे किंवा आपण विनंती करून बसवावे. जाहिरात हे अर्ध-साधन आहे हे मान्य. तरीसुद्धा त्यांत विवेक असावा. पाने वाढवून खर्च वाढवण्यापेक्षा डायजेस्ट स्वरुपाचा अंक आला तर तो हाताळणे सोपे जाईल.

संशोधन पर काही तरी नवे असावे. उदा. अडिवरे महाकाली आपली काहींची कुलस्वामीनी आहे तर तिथे मराठ्यांचा फक्त चौथराच का? कुठे गेलेत मराठे. अनुराधा मराठेंना विचारा. असो.

एकदा आगाशीला या वाटल्यास मुलाखत ठरवा. कळावे राग नसावा. जे आवडेल तेवढे घ्या उरलेले टाळा.

**ज.गो. मराठे**<br>३०४ ॐ रिध्दी सिध्दी अपार्टमेंट, पद्मण नगर, आगाशी ४०१ ३०१.<br>दूरभाष :२५०/२५८८६९५

---------

हितगुजचा पंचाहत्तरावा अंक मिळाला व पूर्णपणे वाचला. मिळाला म्हणून वाचला असे नाही, वाचायलाच हवा असे वाटले म्हणून वाचला. कारण त्यामध्ये असलेल्या अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती ! यापैकी कितीतरी मराठे मला नावा-चेहऱ्याने, त्यांच्या साहित्यामुळे, आकाशवाणीमुळे व दूरदर्शनमुळे माहीत होते. म्हणून मुलाखत वाचण्याची उत्सुकता होती. या अंकातील काही लेख-मुलाखती मला विशेष वाटल्या. उदाहरणार्थ पान ४० - 'आरोग्यदिंडी पंढरीचा' हा लेख - मला विठ्ठल या दैवताविषयी भक्ती वाटते. पंढरीच्या वारकऱ्यांबद्दल आदर आहे. डॉ.अभय मराठे यांना दंडवत. पान ५२ - तीन पिढ्यांचा सराफी व्यवसाय हा लेख - फार फार पूर्वी मी, म्हणजे माझी पत्नी या दुकानात जात असे. मीही बरोबर (नाइलाजाने) पैसे देण्यासाठी जाई. मला या मराठ्यांचा उत्तम अनुभव आहे. अनुभव उत्तम असली तरी पैसे देताना यातना होतच होत ! पान ५५ - 'आम्ही दर्यापार' हे प्रवासवर्णन अत्यंत रोचक आहे. पण त्रोटक वाटते. ग.भा. मराठे यांनी पुस्तक, कमीत कमी पुस्तिका तरी, लिहायला हवे. त्रोटकपणामुळे, अर्ध्या जेवणावरून उठवल्याप्रमाणे झाले. पान ६२ - 'मला उमगलेले अध्यात्म' - फारच छान. माझे वय ७८. मी आवडीने गीता-ज्ञानेश्वरी-गीतेसंबंधातील लेख वाचत असतो. यशवंत मराठेयांचा निष्कर्ष मला पटला. पान ६९ - 'सौ.शुभा रमाकांत विद्वांस यांचा परिचय' - मी रमाकांत विद्वांस यांचा १९५५ पासून, म्हणजे इंजि. कॉलेजात असल्यापासून, स्नेही आहे. परंतु त्याचा व माझा सहकुटुंब परिचय घडण्याचा योग आला नाही. या लेखामुळे शुभावहिनी समजल्या. माझ्या मित्राने नशीब काढले !

सर्व अंक वाचून मी मराठे नाही याचे दुःख झाले. त्याचबरोबर मी महाबळ आहे याचा मला अभिमान आहे. पुढच्या जन्मी मी महाबळांकडे मुलगी म्हणून जन्मावे व लग्नानंतर सौ.मराठे व्हावे असे मनापासून वाटते. पुरुष होण्याचे तोटे सोसले आहेत, स्त्री होण्याचे फायदे पुढच्या जन्मी तरी मिळावेत !

***भा.ल. महाबळ***

### अध्यक्षांचे आवाहन

छपाईखर्च व टपालखर्च यात वाढ झाली आहे तर बँकेतील ठेवीवर मिळणाऱ्या व्याजात घट झाली आहे.

परिणामी मराठे प्रतिष्ठानच्या आजीव सभासदांना रू.१००/- सभासदत्व वर्गणीच्या उत्पन्नातून वार्षिक अहवाल व हिशेबपत्रके पाठविणे शक्य होत नाही. त्यामुळे सर्व आजीव सभासदांनी किमान रू.१००/- रिझर्व्ह फंडासाठी देणगी पाठवावी तसेच 'हितगुज'चे वर्गणीदार नसणाऱ्या आजीव सभासदांनी 'हितगुज'ची तहह्यात वर्गणी म्हणून रू.२००/- आणि 'हितगुज' निधी देणगी म्हणून रू.१००/- पाठवावेत.

म्हणून त्यांनीही 'हितगुज' निधी साठी किमान रू.१००/- देणगी म्हणून पाठवावेत.

आपली रक्कम 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने मुंबईतील बँकेच्या चेक अथवा ड्रॉफ्ट द्वारे पाठवावी, ही विनंती.

आपल्या सहकार्याची खात्री बाळगतो.

**अध्यक्ष**<br>**(आनंदराव मराठे)**<br>**मराठे प्रतिष्ठान**

'हितगुज'चा ७५वा अंक अत्यंत आकर्षक, देखणा, सुंदर व खूपच वाचनीय असून आमचा मराठे परिवार कोणत्याच गोष्टीत मागे नाहीत हे स्पष्ट होते. 'हितगुज' मधील सर्वच लेख मनापासून आवडले-भावले. आपले कौतुक करण्यास शब्द कमी पडतात असे आपले काम आहे. वैयक्तिक आपला खूप आभारी आहे.

कळावे,

***भा.द. मराठे,***

मोरया ब्लॉक ३७, सह्याद्री नगर, मिरज,

जि.सांगली. पिन-४१६४१०

सप्रेम नमस्कार वि.वि.

तुम्ही पनवेल येथे मुलांकडे फोन करून कळविल्यामुळे मी आणि सौ. अभयता 'हितगुज'च्या ७५व्या अंकाच्या प्रकाशन समारंभाला अुपस्थित राहू शकलो. त्याबद्दल आभार.

'हितगुज'चा संपूर्ण अंक विविध विषयावरील मजकुरामुळे वाचनीयच नव्हे तर संग्राह्यही झाला आहे. त्याबद्दल आपल्याबरोबरच श्री. भाऊ मराठे यांचे अभिनंदन. दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा.

कळावे.

***चिं. त्र्यं. मराठे***

नवसरगम सोसायटी (कळवा-ठाणे)

## अभिप्राय

**विख्यात साहित्यिक आणि नाटककार मा. श्री. सुरेश खरे यांचा अमृतमहोत्सवी 'हितगुज' मासिकाविषयीचा अभिप्राय**

८१ सालापासून सतत पंचवीस वर्ष असा अंक सातत्याने काढणं ही मुळात अभिनंदनीय गोष्ट आहे. साधारणपणे संस्था किंवा अशा मंडळांचे जे अंक निघतात त्यामध्ये माहिती असते, अहवाल असतात. परंतु साहित्य कमी असतं. या अंकाच वैशिष्ट्य म्हणजे केवळ माहिती नाही तर वेगवेगळ्या विषयांवरती दर्जेदार लेख यात आढळतात. त्यामुळे संपूर्ण अंक वाचनीय होतो. ही वाचनीयता आणि हा दर्जा पुढील अंकातही कायम राहील याची मला खात्री आहे. पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.

**- सुरेश खरे**

## सहवेदना

श्रीमती मनोरमा गोपाळ मराठे (वय ९०) यांना १९-१०-२००८ रोजी देवाज्ञा झाली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्‌गती देवो.

श्री. श्रीनिवास गोपाळ मराठे यांच्या त्या मातोश्री होत्या.

त्यांच्यामागे मुलगा, सून, मुली, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

कुटुंबियेंच्या दु:खात सहभागी होऊन मराठे प्रतिष्ठानतर्फे श्रद्धांजली वाहात आहोत.

## सहवेदना

श्री. प्रभाकर जगन्नाथ विद्वांस यांचे ता.८.९.२००८ रोजी पहाटे ४.३० वा. राहत्या घरी (माटुंगा मुंबई १९) दु:खद निधन झाले. वय ६९ त्यांच्या पाठीमागे पत्नी, मुलगा, सून, एक नात, मोठे तीन भाऊ, एक लहान भाऊ आणि दोन लहान भगिनी असा परिवार आहे. ईश्वर मृतात्म्यास चिरशांती लाभो.

**विद्वांस बंधू आणि भगिनी**

दु:खात सहभागी होऊन मराठे प्रतिष्ठानतर्फे श्रद्धांजली वाहात आहोत.

## सहवेदना

**श्रीकांत श्रीकृष्ण मराठे** (घराणे ३२ पृष्ठ २४६)

ज. ५ फेब्रुवारी १९४७ मृ. २२ ऑगस्ट २००८



श्रीकांत मराठे पेशाने इंजिनिअर होते. प्रथम पुण्याच्या गव्हर्नमेंट - पॉलिटेक्नीकमधून मेकॅनिकलची पदविका घेऊन व्हिजेटीआय मुंबई येथून प्रॉडक्शन इंजिनिअरींग केले, तेथून ते कमिन्स २३ वर्षे काम करत होते. टूलिंग सिस्टीम्समधील त्यांचे ज्ञान व कामाला फार मोठी मान्यता मिळाली. ४७ व्या वर्षी १९९४ मध्ये त्यांनी स्वत:चा छोटा व्यवसाय सुरू केला.

त्यांच्या आयुष्याचे सार म्हणजे जनप्रियत्व अतिशय निष्कपट, सरळ स्वभाव कोणामध्येही त्यांनी कधी वाईट / दुष्टपणा दिसतच नसे. कोणालाही ओळखत असो, नसो मदतीचा हात देण्याची वृत्ती. त्यामुळे अफाट लोकसंग्रह होता.

१९९४ पासून I.I.P.E इंस्टिट्यूशन ऑफ प्रॉडक्शन इंजिनिअर्सचे पुणे चॅप्टर सुरू केले, पश्चिम विभागात काम पसरवले. नाशिक, संगमनेर, वडोदा, गोवा, पुणे येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात संधी मिळाव्या म्हणून खूप मोठ्या प्रमाणावर प्रकल्प राबवले.

I.I.P.E च्या माध्यमातून प्रत्येक महिन्याच्या तिसऱ्या बुधवारी, अभियंते व विद्यार्थी यासाठी उद्योगाशी संबंधित विविध ताज्या विषयांवर भाषणे चर्चा घडवित. छोट्या मोठ्या उद्योगांसाठी अभियंते व कामगार यासाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण देत. या सगळ्यामध्ये त्यांनी जोडलेल्या माणसांचा मोठा आनंदपूर्ण सहभाग असे.

बोनमॅरो कॅन्सरसारख्या जीवघेण्या दुखण्यामध्येसुद्धा याच स्वभावामुळे शेजारी मित्र आप्तेष्ट, डॉक्टर्स आणि दवाखान्याचे कर्मचारीसुद्धा यांनी खूप मदत केली. प्रेम केले.

**श्रीमती मेधा श्रीकांत मराठे**

ए-१०१ आनंद रेसिडेन्सीसिटी प्राईड शेजारी कोथरुड,

पुणे-४११०३८. दूरध्वनी-०२०-२५४६७१९२

# कै. विष्णू नारायण मराठे



जन्म ३१ ऑगस्ट १९१८ मृत्यू १४ डिसेंबर २००१

*श्लोक : लोके गुरुत्वं विपरीततां वा स्वचेष्टितान्येव नरं नयन्ति।*
*माणूस आपल्या सत्कृतींनी आपल्या उज्वल भविष्याचा शिल्पकार बनतो॥*

**यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन**

महाराष्ट्रीय लोकांमध्ये आणि विशेषत:
समस्त मराठे कुटुंबियांमध्ये बांधकाम क्षेत्रामधील
एकमेव विश्वसनीय नाव

**निर्माण ग्रुप ऑफ कंपनीज्**

संचालक - श्री. अजित श्रीराम मराठे



**नेरळ स्टेशनपासून फक्त १ कि.मी. अंतरावर,**

**उल्हास नदीकिनारी वसलेली बंगलो स्कीम**

आमचे अन्य प्रोजेक्टस्

- निर्माण माथेरान व्हॅली नेरळ - बंगलो स्कीम
- निर्माण नगरी नेरळ - मिनी टाऊनशिप
- ऋतुनिर्माण नेरळ - बंगलो स्कीम
- खंडाळा - निर्माण हायलॅन्ड बंगलो स्कीम
- मधुसुमित्रा निर्माण - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम
- निर्माण लेक व्ह्यू - गोरेगांव-माणगांव (मुंबई-गोवा महामार्ग) - अपार्टमेंटस् स्कीम

आमचे मुंबईतील प्रोजेक्टस्

- महालक्ष्मी,
- जोगेश्वरी,
- गोरेगाव,
- मालाड,
- कांदिवली,
- विलेपार्ले (पूर्व) आणि विलेपार्ले (पश्चिम) स्टेशन समोर

हेड ऑफिस :१४, न्यायसागर अपार्टमेंट, नागरदास रोड, चिनॉय कॉलेज समोर, अंधेरी (पूर्व), मुंबई-६९
संपर्क : २६८३ ३१३१ () साईट ऑफिस : नेरळ (सेंट्रल रेल्वे मुंबई-कर्जत मेन लाईन),
दूरध्वनी : ०२१४८-२३८२५१ / ०२१४८-२३६६९६

**BOOK POST**

**If undelivered, please return to**

**संपादिका : 'हितगुज'**
८/१३, सहकार नगर,
वडाळा,
मुंबई - ४०० ०३१

त्रैमासिक हितगुज हे मराठे प्रतिष्ठान, मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई-४०००२५ या न्यासाचे मुखपत्र असून फक्त सभासदांसाठी वितरित होते.
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक : डॉ.सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई-३१. दूरध्वनी : २४१५०८८९ ● ई-मेल : prabhakar_marathe@yahoo.com
ई-मेल (१)**sitaram_khambete@yahoo.com** (२)**maratheparivar@yahoo.co.in** वेबसाईट: **www.marathepratishthan.org**